# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०३ मार्च, २०२३ / फाल्गुन १२, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **बंदरे आणि खनिकर्म मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४३**

---

### राज्यातील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबत

**(१) * १७७१२ श्री.राजेश राठोड, श्री.कपिल पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.किरण सरनाईक, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माहे नोव्हेंबर, २००५ व त्यानंतरच्या कालावधीत सेवेत रुजू झालेल्या सर्व कर्मचारी व शिक्षक यांनाही राज्याची आर्थिक स्थिती सुधारल्यास जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा विचार राज्य शासन करील असे उत्तर मा.उप मुख्यमंत्री यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,कोणताही भेदभाव न करता सर्व शासकीय/ निमशासकीय कर्मचारी व अनुदानित शिक्षक यांना झारखंड, राजस्थान आणि छत्तीसगड प्रमाणे जुनी पेन्शन लागू करण्याबाबत विविध संघटनांकडून होणाऱ्या मागण्यांबाबत शासनाने काय विचार केला आहे,

(३) असल्यास, झारखंड, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राची आर्थिक स्थिती जुनी पेन्शन देण्याकरीता सक्षम आहे किंवा कसे याबाबत तपशीलवार माहिती देण्याबाबत तसेच स्थापन केलेल्या अभ्यासगटाचा अहवाल देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सध्याच्या आर्थिक स्थितीत याचा विचार करणे कठीण आहे. मात्र राज्याची अर्थव्यवस्था वाढते आहे आणि ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था तयार होईल त्यावेळी राज्याची क्षमता देखील वाढेल व त्यावेळी याचा विचार करणे शक्य होईल अशा आशयाचे उत्तर दिले होते.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत घोडाझरी कालव्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२) * १७५२३ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पाअंतर्गत घोडाझरी कालव्याचे कामास सन २००६ मध्ये मान्यता मिळून व त्यावर ४६ कोटी रुपये खर्च होवूनही अद्याप कालव्याचे काम पूर्ण झाले नसल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालव्याचे काम कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे, कामास विलंब लागण्यामागची कारणे काय आहेत,

(३) याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर घोडाझरी कालव्याचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) संपूर्ण कालव्याची कामे अंदाजे जून, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

कामास विलंब होण्याची कारणे खालीलप्रमाणे :-

१) गोसीखुर्द प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध निधीचे वितरणात प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनास व त्यांचा भूसंपादनास प्राधान्य असणे.

२) कालव्यासाठी लागणाऱ्या ४०३ हे. खाजगी जमिनीचे संपादन.

३) करोना महामारीमुळे कालव्याची सर्व कामे बंद असणे.

४) रेल्वे क्रॅसिंगच्या ३ कामास रेल्वे विभागाकडून विलंबाने परवानगी मिळणे.

५) वडनेरे समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने प्रगतीपथावरील १७ निविदा रद्द करून फेरनिविदा काढणे.

(३) कालव्याच्या कामात होणारा विलंब उपरोक्त कारणांमुळे झाला आहे. तथापि, आता प्रकल्पाअंतर्गत १००% पाणीसाठा निर्माण झाल्यामुळे कामांचे कालबध्द नियोजन करुन आवश्यक निधीची तरतूद करुन कालवे व वितरण प्रणालीची कामे प्राधान्याने हाताळण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आष्टी (जि.जालना) पोलीस चौकीचे सहायक पोलीस निरीक्षक यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(३) * १७००६ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कोकाटे हादगाव (ता.परतुर, जि.जालना) येथे शेतीच्या वादातून गावातील दोन समुदायांमध्ये वाद होऊन काही लोकांच्या घरावर हल्ला करण्यात आल्याने अनेक लोक जखमी झाल्याची तक्रार देण्यासाठी तक्रारदार आष्टी पोलीस चौकीला गेले असता, त्यांचेवर खोटे गुन्हा दाखल करुन कारागृहामध्ये कोंडून सहायक पोलीस निरीक्षक यांनी अमानुषपणे मारहाण केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मारहाणीची ध्वनिफित व्हायरल झाली असून त्यात पोलीस अमानुषपणे मारहाण करतांना ऐकू येत आहेत तसेच एका लोकप्रतिनिधीबद्दल पोलीस अश्लिल भाषेत शिवीगाळ करीत असून सदरील घटना दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ रोजी आष्टी पोलीस चौकी येथे घडली असून यावेळी बीट जमादारानेही कोकाटे हादगाव येथील ७ नागरिकांना मारहाण केली,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, फिर्याद देण्यासाठी गेलेल्या लोकांवर भां.द.वी. ३२४, ३२३, ५०४, १४८ प्रमाणे खोटे गुन्हे दाखल करुन न्यायालयासमोर हजर न करताच दोन दिवस पोलीस स्टेशनला डांबून ठेवून मारहाण केली, आष्टी पोलिसांकडून अधिकाराचा दुरुपयोग करण्यात आला असून एका लोकप्रतिनिधीला शिवीगाळ करून त्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केला आहे त्यामुळे अशा जातीयवादी व चुकीची भूमिका घेवून गोरगरिबांना मारहाण करणाऱ्या व लोकप्रतिनिधी यांना शिवीगाळ करणाऱ्या सहायक पोलीस निरीक्षक यांच्यावर कारवाई करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सहायक पोलीस निरीक्षक यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) दिनांक २८/११/२०२२ रोजी कोकाटे हादगाव येथे दोन कुटुंबातील शेतातील पाण्याचे चारीवरुन झालेल्या वादावरुन पोलीस ठाणे आष्टी येथे परस्परविरोधी दोन गुन्हे दाखल झाले आहेत. यानुषंगाने श्री.परमेश्वर मस्के, यांनी पोलीस ठाणे, आष्टी येथे दिलेल्या तक्रारीवरुन श्री.विकास डोंगरे व इतर १० आरोपींविरुध्द गु.र.क्र. २६५/२०२२ कलम ३२४, ३२३, १४३, १४७, ५०४ भा.दं.वि. प्रमाणे तसेच, श्री.विकास डोंगरे, यांनी पोलीस ठाणे आष्टी येथे दिलेल्या फिर्यादी वरुन श्री.परमेश्वर मस्के व इतर १० आरोपींविरुध्द गु. र. क्र. २६६/२०२२ कलम ३२४, ३२३, १४३, १४७, ५०४ भा. दं. वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी दिनांक ०३/१२/२०२२ रोजी सकल धनगर समाज यांचेवतीने दिलेल्या निवेदनाच्या संबंधाने सदर प्रकरणाची वस्तुनिष्ठ व न्यायिक चौकशी होण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस ठाणे, आष्टी येथील संबंधित प्रभारी अधिकारी तथा सपोनि शिवाजी नागवे व इतर ३ यांना पोलीस ठाणे, आष्टी येथुन पोलीस नियंत्रण कक्ष, जालना येथे संलग्न करण्यात आले आहे.

व्हायरल झालेल्या ध्वनिफितीची पडताळणी होणे आवश्यक असल्याने सदर प्रकरणी चौकशी अधिकारी पोलीस निरीक्षक, परतुर यांचेमार्फतीने करण्यात आलेल्या सविस्तर फेरचौकशी अहवालावरून कसुरी केल्याचे दिसून आल्याने पोलीस अधीक्षक, जालना यांनी दिनांक १७/०२/२०२३ रोजी सपोनि नागवे व इतर अंमलदार यांना देय वार्षिक वेतनवाढ ३ वर्षे परिणामाशिवाय स्थगितीबाबत कारणे दाखवा नोटिस बजावली आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील दहेली धरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४)** * **१७४५७ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या ग्रामस्थांना कायमस्वरुपी पाणी उपलब्ध व्हावे याकरीता प्रस्तावित करण्यात आलेले दहेली धरण १९७४ साली मंजूर करण्यात आले असून प्रत्यक्ष कामास सुरुवात सन १९७९ मध्ये करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यावेळी ३ कोटी ७९ लक्ष रुपयांची निविदा काढण्यात आलेल्या सदर कामावर आतापर्यंत २४६ कोटी रुपये खर्च करुनही सदर धरणाचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणाचे काम प्रलंबित ठेऊन अंदाजपत्रकाची किंमत वाढविण्यात संबंधित अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमत असल्याचा संशय निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने एवढया मोठ्या प्रमाणात शासकीय निधी खर्च करुनही धरणाचे काम अपूर्ण अवस्थेत ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. देहली मध्यम प्रकल्पास शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्र. डिएचएल १०७९/५०४(१८१८)/ जसंअ दिनांक १७/११/१९७९ अन्वये रुपये ३९५.१० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली असून सन १९७९ पासून प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही. सदर प्रकल्पाची मूळ प्र.मा. रुपये ३.९५ कोटी किंमतीची असून रुपये २४६.४९ कोटी इतक्या रकमेची तृतीय सु.प्र.मा. मिळालेली आहे. सदर प्रकल्पावर जानेवारी, २०२२ अखेर रुपये २६३.९० कोटी एवढा खर्च झालेला आहे. देहली प्रकल्पाची घळभरणी माहे मे, २०२२ अखेर पूर्ण करण्यात आलेली असून प्रकल्पात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा निर्माण झालेला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) सन १९७९ मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेनंतर प्रकल्पाची सुरुवात सन १९७९ मध्ये करण्यात आली. परंतु बुडित क्षेत्रातील प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाविषयी विविध बाबी उद्भवल्याने धरणाची कामे काही कालावधी मध्ये बंद होती. डिसेंबर, २०२१ अखेर प्रकल्पबाधित पुनर्वसनाचे सर्व प्रश्न तडजोडीने सोडविल्यामुळे धरणाची घळभरणी पूर्ण करुन जून, २०२२ मध्ये धरणात १०० टक्के पाणीसाठा निर्माण करण्यात आला आहे. प्रकल्पावर सिंचन क्षमता ३१६५ हे. निर्मिती प्रस्तावित असून त्याकरीता बंदिस्त नलिकाव्दारे वितरण प्रणाली नियोजित आहे व संकल्पनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील इरई नदीचे पुनरूज्जीवन आणि खोलीकरणाचे काम करण्याबाबत

**(५) * १७२८५ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इरई नदीचा उगम चिमूर व वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातून झाला असून उगमापासून ते वर्धा नदीच्या संगमापर्यंत इरई नदीची एकूण लांबी ११० कि.मी. असून नदीवर वरोरा तालुक्यामध्ये चंदई आणि चारगांवमध्ये मध्यम प्रकल्प आणि भद्रावती तालुक्यामध्ये महाजनकोने इरई धरण बांधले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा इरई धरणातून दाताळगाव येथून होत असून इरई नदीमध्ये झाडेझुडपे आणि अस्वच्छतेमुळे दुरवस्था झाली असून सन, २०१५ पासून सदर नदीचे खोलीकरण आणि पूर संरक्षणात्मकाची करण्यात येणारी कामे निधी अभावी रखडली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बॅक वॉटरमुळे सुध्दा इरई नदीला पूर येवून पुराच्या पाण्यामुळे चंद्रपूर शहराचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने इरई नदीचे पुनरूज्जीवन आणि खोलीकरणाचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

यापूर्वी सन २०१६ ते २०१८ मध्ये वेस्टर्न कोलफील्ड लिमिटेड (WCL) यांचेकडून प्राप्त झालेल्या ५.४० कोटी निधी चा वापर करून इरई नदीतील चंद्रपूर शहरास समांतर वाहणाऱ्या ७ कि.मी.लांबी मधील गाळ व झाडे-झुडपे काढण्यात आलेली आहे.

तथापि, तद्नंतर पुन:श्च गाळ व झाडे-झुडपे वाढली असल्याने खोलीकरण करणे आवश्यक आहे. या करिता दिनांक २३/०२/२०२२ रोजी तात्कालीन मा. उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये सदरची कामे मुख्य अभियंता (यांत्रिकी) व वेस्टर्न कोलफील्ड लिमिटेड यांचेकडील मशीनरी वापरून नदी खोली करण्याचे काम करावे व मशीनरीचे डिझेल व दुरूस्ती करीता निधीची तरतूद जिल्हा अधिकारी, चंद्रपूर यांनी त्यांच्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत करावी, असे निर्देश प्राप्त आहेत.

त्यानुसार दिनांक २३/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना ईरई नदीमधील चंद्रपूर शहरालगतच्या भागातील गाळ काढण्यासाठीचे रूपये ६.०६ कोटीचे अंदाजपत्रके क्षेत्रीय स्तरावरून सादर करण्यात आले होते. त्यांनतर जिल्हा नियोजन अधिकारी, चंद्रपूर यांचे दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर कामास निधी उपलब्ध करण्यात येईल असे कळविले आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर सदर काम हाती घेण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुटुंब न्यायालयांची संख्या वाढविण्याबाबत

**(६) * १७०६६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १४१४२ ला दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी असल्याने कायद्यानुसार राज्यात ३९ कुटुंब न्यायालयांची आवश्यकता असतानाही सद्य:स्थितीत केवळ १९ कुटुंब न्यायालये कार्यरत असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात सुमारे ५००० घटस्फोटाचे दावे प्रलंबित असताना केवळ ७ कुटुंब न्यायालये कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १९८४ च्या कुटुंब न्यायालय कायद्यातील कलम ३ मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे दहा लाखांपेखा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक भागात कुटुंब न्यायालये स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्यातील कुटुंब न्यायालयांची संख्या वाढविण्याबाबत शासन स्तरावर चालू असलेली कार्यवाही पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सद्य:स्थितीत राज्यात एकूण ३७ कुटुंब न्यायालये कार्यरत आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) राज्यातील कौटुंबिक वादाचे खटले निकाली काढण्यासाठी १४ व्या वित्त आयोगा पूर्वी राज्यात ११ जिल्ह्यांमध्ये २५ कौटुंबिक न्यायालये (मुंबई-७, पुणे-५, नागपूर-४, छत्रपती संभाजी नगर-२ तसेच, ठाणे, अकोला, अमरावती, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड या जिल्ह्यांच्या ठिकाणी प्रत्येकी १) स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

१४ व्या वित्त आयोगांतर्गत ५ वर्षांच्या कालावधीकरीता राज्यात लातूर, बीड, जालना, धाराशिव, परभणी, सांगली, रायगड-अलिबाग, जळगांव, यवतमाळ, अहमदनगर, सातारा, धुळे, बुलढाणा व भंडारा येथील प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण १४ कुटुंब न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. सदर न्यायालये नियमित/ कायमस्वरुपी सुरु ठेवण्यास दिनांक ०१/०४/२०२२रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

दिनांक ०२/०७/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये ठाणे येथे १ अतिरिक्त कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

दिनांक २२/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये बेलापूर, नवी मुंबई येथे १ कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे राज्यात एकूण ४१ कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

तसेच, मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त माहितीनुसार मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक व सोलापूर येथे अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्याबाबत कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी लाच घेतलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत

**(७) * १७४२८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी आठ लाखांची लाच मागणाऱ्या अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीच्या वरिष्ठ लिपिकासह तिघांविरोधात धुळे शहर पोलीस ठाणे येथे जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील तक्रारदार यांनी १९ वर्षांपासून सर्व कागदपत्रांचा पाठपुरावा करून स्वतःचे व त्यांच्या मुलीचे जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रकरण सादर केले होते तरीही त्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणाशी संबंधित असलेल्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व तक्रारदार यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) I. तक्रारदार शिक्षक यांच्या तक्रारीवरुन जातवैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी रुपये १०,००,०००/- इतक्या रकमेच्या लाचेची मागणी व तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती रुपये ८,००,०००/- इतक्या रकमेची मागणी पडताळणीअंती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून निष्पन्न झाले आहे. तसेच आलोसे, वरीष्ठ संशोधन अधिकारी, वर्ग-१ नेमणुक जात पडताळणी समिती, कार्यालय, धुळे यांनी तक्रारदार यांना लाच देणेबाबत प्रोत्साहन दिले म्हणून तिन्ही आलोसे यांचेविरुध्द धुळे शहर पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७, ७ अ, १२ प्रमाणे दिनांक ३०/१२/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.

II. संबंधित प्रकरणी तक्रारदार यांचे प्रकरण दिनांक २२/०७/२००२ रोजी नाशिक समितीकडे व त्यांच्या मुलीचे प्रकरण दिनांक २९/१०/२०२० रोजी नंदुरबार समितीकडे सादर करण्यात आले होते. सदर प्रकरणी धुळे समितीने दिनांक १०/११/२०२२ रोजी तक्रारदार शिक्षक तसेच त्यांची मुलगी यांच्या प्रकरणात निकाल पारित करुन त्यांचा दावा वैध असल्याचे आदेश पारित केले तसेच दिनांक ११/११/२०२२ रोजी जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत

**(८)** * **१६९२७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्यांची सेवा संरक्षित करण्याच्यादृष्टीने मंदिर समितीने सन २०१८ मध्ये २७० पदांचा आकृतिबंध तयार करून शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णय क्र.पीटीए/१३१८/१२१८/प्र.क्र.१२६/का.१६ दिनांक ०३/०१/२०१९ अन्वये मान्यता दिली असून त्यानुषंगाने सर्व कर्मचाऱ्यांना सामावून घेवून नियमित सेवेत घेण्याचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना मंजूर आकृतीबंधानुसार ६व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून, त्यांना अद्यापही दिनांक १ जून, २०१९ पासून महागाई भत्ता व ५ टक्के प्रमाणे घरभाडे भत्ता देण्यात आलेला नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांनाही ७ वा वेतन आयोग लागू करण्याची मागणी सातत्याने ते करीत असून त्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार महागाई भत्ता व घरभाडे भत्ता न देण्याची कारणे काय आहेत,
(५) श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार फरकासह महागाई भत्ता व घरभाडे भत्ता किती कालावधीत देण्यात येईल तसेच कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

शासनाच्या दिनांक ०३/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या सुधारित आकृतीबंधास शासन निर्णयात नमूद अटी व शर्तींनुसार मान्यता देण्यात आली आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

शासनाने केवळ आकृतीबंधास मान्यता दिली आहे. पंढरपूर मंदिरे अधिनियमातील तरतुदीनुसार मंदिरे समितीने धर्मादाय आयुक्त यांच्या मान्यतेने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर या समितीच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ जून, २०१९ पासून ६ व्या वेतन आयोगानुसार व त्यांच्या सेवा ज्येष्ठतेनुसार १००%, ७५% व ५०% प्रमाणे महागाई भत्ता व घरभाडेभत्ता समितीमार्फत अदा करण्यात येत आहे.
(४) व (५) पंढरपूरातील विठ्ठल - रुक्मिणी मंदिर व परिसरातील देवता मंदिरे यांच्या व्यवस्थापनासाठी पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ हा स्वतंत्र कायदा करण्यात आला आहे. या अधिनियमातील कलम ३८ (२) नुसार या अधिनियमान्वये नेमणूक करण्यात आलेले कार्यकारी अधिकाऱ्या व्यतिरिक्त इतर अधिकारी, कर्मचारी व इतर व्यक्ती या समितीचे अधिकारी व कर्मचारी असतील व त्यांचे वेतन व भत्ते धरुन त्यांच्या सेवेच्या शर्ती ह्या धर्मादाय आयुक्तांच्या मान्यतेने समितीकडून ठरविण्यात येतील, अशी तरतुद आहे. कार्यकारी अधिकारी व्यतिरिक्त इतर समितीचे अधिकारी व कर्मचारी हे शासकीय कर्मचारी नाहीत.

या अधिनियमात समितीचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च दाननिधीतून करण्याबाबत कलम ३८(२) व ४४(इ) मध्ये तरतूद आहे. तथापि, त्यामध्ये दाननिधीच्या वार्षिक उत्पन्नाच्या किती मर्यादेत खर्च असावा यासंबंधी उल्लेख नाही. अधिनियमातील कलम ५६ नुसार अधिनियमात स्पष्टपणे तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाच्या तरतुदी लागु होतील. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील कलम ५६QQ नुसार दाननिधीच्या एकूण वार्षिक उत्पन्नाच्या १०% पेक्षा जास्त नसेल इतक्या रक्कमेतून समितीचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांना वेतन, भत्ते व इतर देय रकमा अदा करण्यात येतील, अशी तरतुद आहे.

समितीने सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करतेवेळी समितीच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या पगार व भत्यांवर होणारा खर्च एकूण उत्पन्नाच्या १० टक्याच्या मर्यादेत ठेवणे आवश्यक असल्याने समितीच्या उत्पन्नात जशी वाढ होईल त्याप्रमाणे महागाई भत्यामध्ये राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे वाढ करण्यात येणार असून त्यास समितीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी संमतीपत्र दिलेले आहे, असे नमूद केले होते. शासनाच्या दिनांक ३/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित आकृतीबंधाला मान्यता देताना कर्मचाऱ्याच्या वेतनावरील खर्च १०% मर्यादेत राहील, अशी अट टाकण्यात आली आहे. समितीच्या अधिकारी, कर्मचारी यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार महागाई भत्ता व घरभाडे भत्ता अदा केल्यास व्यवस्थापनावरील खर्च दाननिधीच्या वार्षिक उत्पन्नाच्या २४.६५% होणार आहे. सदर बाब ही महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील कलम ५६QQ मधील तरतुदी व शासन निर्णय दिनांक ०३/०१/२०१९ मध्ये नमूद अटी व शर्तींशी सुसंगत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील महावितरणच्या कार्यालयात कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्याबाबत

**(९) * १७१०० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यात महावितरणच्या सुमारे ३० हजार वीज ग्राहकांसाठी अवघे ११ कर्मचारी कार्यरत असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विक्रमगडमधील वीज ग्राहकांना सुविधा पुरविताना उपलब्ध कर्मचारी वर्गावर मोठा ताण पडत आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विक्रमगड तालुक्यातील महावितरणच्या कार्यालयात पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महावितरण कंपनीच्या कर्मचारी मानांकनानुसार विक्रमगड तालुक्यातील विक्रमगड उपविभागीय कार्यालयामध्ये ६ पदे मंजूर असून तेथे एकूण ६ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच विक्रमगड शाखा कार्यालयामध्ये एकूण १४ पदे मंजूर असून तेथे ८ नियमित व ५ बाह्यस्त्रोत कर्मचारी असे एकूण १३ कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.३ च्या कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाई करणेबाबत

**(१०) * १७१६८ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.३ च्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्र्यांकडे लेखी तक्रार केलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंगी (ता.शेवगांव जि.अहमदनगर) येथील शासकीय मालमत्तेचे नुकसान करुन अतिक्रमण केल्याचा प्रश्न वारंवार अधिवेशनामध्ये उपस्थित होवुनही व पोलीस अधिक्षकांनी संरक्षण देवुनही संबंधित अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक काहीही कार्यवाही केलेली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलसंपदा विभागाच्या मालमत्तेचे नुकसान व अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीवर जलसंपदा विभागाने अद्याप गुन्हा दाखल केलेला नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी कार्यवाही होवुन दोषींना व त्यांना पाठीशी घालणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी पोलीस संरक्षणामध्ये अतिक्रमण काढण्याचे काम दिनांक २०/०५/२०२२ रोजी पूर्ण केले आहे.

(३) नाही. जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत पो.स्टे. शेवगाव येथे संबंधित व्यक्तींवर दिनांक २८/०२/२०२२ रोजी [First Information Report] गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे, कल्याण आणि अंबरनाथ येथील जमीन गिरणी कामगारांकरिता घरे बांधण्यासाठी उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) * १७१९५ श्री.प्रसाद लाड, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कल्याण आणि अंबरनाथ येथील ११० एकर जमीन गिरणी कामगार कृती संघटनेने आंदोलन केल्याने शासनाकडून प्राप्त झाली असून शासनाने बांधकाम करण्यासाठी अद्यापही सदरहू जागा म्हाडाकडे हस्तांतरित केली नसल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत शासनाच्या काळात गिरणी कामगारांसाठी पंतप्रधान आवास योजनेतील मान्य करण्यात आलेली ६० हजार घरे बांधण्यास देखील अद्याप सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) भाडे तत्त्वावरील गृहनिर्माण योजनेतील पनवेल परिसरातील कोन गावातील २,४१८ घरांचा ताबा गिरणी कामगारांना मिळण्याबाबत काही कामगारांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण), अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांना निवेदन सादर केले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे, कल्याण आणि अंबरनाथ येथील ११० एकर जमिनीवर, तसेच पंतप्रधान आवास योजनेंतर्गत गिरणी कामगारांसाठी घरांचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर झालेली घरे गिरणी कामगारांसाठी देण्याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) मौजे कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथील रेंटल हौसिंग योजनेंतर्गत गिरणी कामगारांच्या घरासाठी उपलब्ध झालेल्या २,४७१ सदनिका कोविड-१९ रुग्णांच्या विलगीकरणासाठी देण्यात आल्या होत्या. सदर सदनिकांची दुरावस्था झाली असल्यामुळे उक्त सदनिकांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदनिकांचा ताबा गिरणी कामगारांना देण्यापूर्वी या सदनिकांची दुरुस्ती व इतर कामे करावयाची असल्याने त्याकरीता अंदाजे रुपये ५२.७१ कोटी खर्च अपेक्षित असून, सदर खर्च एम.एम.आर.डी.ए.ने करण्यासंदर्भात उचित आदेश देण्याची विनंती नगरविकास विभागास दिनांक २९/११/२०२२ रोजी करण्यात आली आहे.

बृहन्मुंबईमध्ये गिरण्यांच्या जागेवर म्हाडास उपलब्ध होणारी जागा व गिरणी कामगारांच्या अर्जांची संख्या विचारात घेता, ठाणे जिल्ह्यातील ५ गावातील ११० एकर शासकीय जमीन गिरणी कामगारांच्या घरांकरीता म्हाडास उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

सदर जमिनीवर प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गिरणी कामगारांसाठी घराचे बांधकाम करण्याचे शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

## विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे पुनर्गठीत करुन प्रादेशिक विकासाचा अनुशेष दूर करण्याबाबत

**(१२) * १७७०९ श्री.अंबादास दानवे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १६२४६ ला दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे पुनर्गठित करणे आणि त्यांना वैधानिक विकास मंडळे संबोधण्यात यावे यासाठी मंत्रिमंडळ निर्णयानुसार दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये तीनही विकास मंडळे पुनर्गठित करण्याबाबत केंद्रशासनाकडे पत्रव्यवहार करुनही केंद्राकडून मान्यता देण्याबाबत कोणताही निर्णय झाला नसल्याची बाब दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांच्या क्षेत्रास विकास खर्चाकरीता मा.राज्यपालांच्या सन २००२ च्या निदेशानुसार विभाज्य निधी वाटप विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ क्षेत्राकरीता अनुक्रमे २३.०३%, १८.७५% व ५८.२३% या प्रमाणात करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सन २०१४ ते सन २०१९ पर्यंत विदर्भ, मराठवाडा व उर्वरीत महाराष्ट्राचे अनुशेष भरण्यासाठी किती निधीची तरतुद करण्यात आली, किती निधी वितरीत करण्यात आला, तसेच दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी या तीनही वैधानिक विकास महामंडळाची मुदत संपुष्टात येवूनही त्यावेळी कार्यरत आघाडी शासनाने मुदतवाढ दिलेली नसल्याने या मागास भागात विकासाचा असमतोल वाढल्याने अनेक विकासाचे प्रकल्प रखडले असून प्रादेशिक विकास अनुशेषात वाढ झालेली दिसून येत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठवाड्याच्या विकासासाठी सिंचन विभागाचा ३५ हजार कोटी तसेच रस्ते, शिक्षण, कृषी, ऊर्जा, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम या विभागाचा एकूण ८० हजार कोटी रुपयांचा अनुशेष देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने शासनाने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे पुनर्गठीत करण्यासाठी केंद्रशासनाकडून मंजुरी मिळवून विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन, रस्ते, शिक्षण, कृषी, ऊर्जा, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम विभागांच्या कामांना पुर्वीप्रमाणे विशेष निधी उपलब्ध करुन अनुशेष दूर करुन आवश्यक विकास निधीची तरतुद अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२३ मध्ये करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही, मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २८/१०/२०२२ च्या अर्धशासकीय पत्रान्वये मा.गृहमंत्री, भारत सरकार यांना तीनही विकास मंडळे पुनर्गठित करण्याची विनंती करण्यात आली आहे. त्यासंदर्भात मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर प्रकरणी केंद्राकडून मान्यता देण्याबाबत कोणताही निर्णय झाला नसल्याची बाब दिनांक ०४/०१/२०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आलेली नाही.

(२) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये विदर्भ, मराठवाडा व उर्वरीत महाराष्ट्र विकास मंडळांच्या क्षेत्रास विकास खर्चाकरीता निधीचे मा.राज्यपालांच्या सन २००२ च्या निदेशानुसार अद्यापपर्यंत विभाज्य निधी वाटप विदर्भ, मराठवाडा व उर्वरीत महाराष्ट्र विकास मंडळ क्षेत्रात अनुक्रमे २३.०३%,१८.७५% व ५८.२३% या प्रमाणात करण्यात येते.

(३) होय, हे अंशत: खरे आहे. अनुशेष ही विकासाच्या ओघात निर्माण होणारी विषमता असून विषमता दूर करण्याची प्रक्रिया निरंतर सुरु राहणार आहे. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१(२) मधील तरतूदीनुसार मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्यावर संबंध राज्याच्या गरजा साकल्याने विचारात घेऊन तीन ही क्षेत्रात विकास खर्चाकरीता निधीचे समन्यायी वाटप करण्याची विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी विहित केलेल्या सुत्रानुसार वार्षिक योजनेतील विभाज्य नियतव्ययाचे वाटप करण्यात येते. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र क्षेत्रात सन २०१४ ते सन २०१९ या कालावधीत वर्षनिहाय विभाज्य निधी वाटप व प्रत्यक्ष वितरीत निधी याची माहिती खालील तक्त्यात देण्यात येत आहे:

(रुपये कोटीत)

| सन | एकूण निधी | विभाज्य निधी | प्रदेशनिहाय वितरीत विभाज्य निधी | | | अविभाज्य निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | |
| २०१४-१५ | ६३५६०.१२ | ४०७५७.९९ | ११११४.८२ | ६९९२.६३ | २२६६४.५४ | २२८०२.१३ |
| २०१५-१६ | ६८७६२.४८ | ४६४०७.४० | १३६०२.८१ | ८३२२.३६ | २३२०३.२५ | २२३५५.०८ |
| २०१६-१७ | ७१३२९.४२ | ४०२८८.९५ | १३९७७.६५ | ८९०५.५० | २४४०५.८० | २४०४०.४७ |
| २०१७-१८ | १२८७६७.३३ | ५५५२१.२७ | १४८३८.९५ | १०६४७.५४ | ३००३४.७९ | ७३२४६.०६ |
| २०१८-१९ | १२१७०३.५६ | ६६७९७.३८ | १८०३२.०५ | १२५३३.८९ | ३६२६६.२२ | ५४९०६.१८ |
| २०१९-२० | १५२७६०.१५ | ८२६५१.४५ | २१८५८.९३ | १६४४९.१५ | ४४३४३.३७ | ७०१०८.७० |

विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाची मुदत दिनांक ३०/०४/२०२० रोजी संपुष्टात आली असली तरी मा.राज्यपाल यांनी विहित केलेल्या सुत्रानुसार वार्षिक योजनेतील विभाज्य नियतव्ययाचे वाटप सन २०२०-२१ ते अद्यापपर्यंत विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र प्रदेशनिहाय करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही. निर्देशांक व अनुशेष समितीने दिनांक ०१/०४/१९९४ रोजी मराठवाड्याचा सिंचन क्षेत्रासह वित्तीय अनुशेष रुपये ४००४.५५ कोटी निश्चित केला होता.तो अनुशेष दूर झालेला आहे. तसेच मराठवाड्याचा सिंचनाचा भौतिक अनुशेष ४३०६४० हेक्टर रब्बी समतुल्य निश्चित केला होता.त्यापैकी ९८ टक्के म्हणजे ४२२७३० हेक्टर रब्बी समतुल्य अनुशेष दूर करण्यात आला आहे. तद्नंतर दिनांक १/४/२००० रोजी अनुशेष परिगणित करण्यात आला. सदर परिगणित अनुशेषानुसार मराठवाड्याचा सिंचन क्षेत्रातील वित्तीय अनुशेष रुपये २१७३.९६ कोटी असून अन्य १० विकास क्षेत्रातील वित्तीय अनुशेष रुपये १३७३.१० कोटी होता. सन २००० नंतर प्रदेशनिहाय अनुशेष परिगणित करण्यात आलेला नाही. मा.मुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२२ च्या तृतीय अधिवेशनात दिनांक २९/१२/२०२२ रोजी जाहीर केल्यानुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे पुनर्गठन

झाल्यानंतर राज्यातील विविध प्रदेश आणि क्षेत्रामध्ये असंतुलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी मार्ग सुचविण्यासाठी समिती स्थापन करण्यात येईल. सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल.

(५) मा.राज्यपालांच्या निदेशानुसार सन २०११-१२ पासून तीन ही विकास मंडळांना देण्यात येणारा विशेष निधी बंद करण्यात आला आहे. अपवादात्मक बाब म्हणून सन २०१४-१५ व सन २०१९-२० या वर्षात मा.राज्यपालांच्या मान्यतेने राज्यातील १२५ तालुके व ४५ "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रांमधील मानव विकास निर्देशांक वृध्दींगत होण्याच्या दृष्टीने विकास मंडळांना विशेष निधी देण्यात आला आहे. वरील (४) येथे नमूद केल्यानुसार राज्यातील विविध प्रदेश आणि क्षेत्रामध्ये असंतुलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी मार्ग सुचविण्यासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने शासनस्तरावर निर्णय घेण्यात येईल. तीन ही विकास मंडळे संपुष्टात आली असली तरी वार्षिक योजनेतील विभाज्य निधीचे वाटप वरील (३) येथे नमूद करण्यात आल्यानुसार राज्यपालांच्या विहीत सुत्राप्रमाणे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र प्रदेश निहाय करण्यात येत आहे.

-----------------

## सारंगपुरी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील मुमरी धरण प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१३) * १७५३९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारंगपुरी (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील मुमरी धरण प्रकल्पाचे काम मातीच्या अभावामुळे गेल्या ३ महिन्यांपासून ठप्प असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी १४० कोटी रुपये खर्च करण्यात आले असून धरणाच्या मुख्य गाभा (घळ) भरणीच्या भरावाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली काळी चिकट माती ही धरण क्षेत्रात कुठेही उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त माती उपलब्ध करून धरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

मुमरी धरणाच्या ४५% टक्के मातीकाम पूर्ण झाले असून, माहे जानेवारी, २०२३ अखेर रुपये ११०.२२ कोटी खर्च झालेला आहे. मुमरी धरणाच्या उर्वरित कामासाठी आवश्यक असणारी गाभा भराव माती पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही.

(३) मुमरी धरणाच्या उर्वरित कामासाठी आवश्यक असणारी गाभा भराव माती कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने सदर उपलब्ध परिमाणातच धरणाचे काम पुनश्चः सुरु करण्या हेतू मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्या सहाय्याने विविध तांत्रिक पर्यायांचा अभ्यास करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पायधुनी व मस्जिद बंदर परिसरात अवैध सौंदर्यप्रसाधनांची विक्री करण्यात येत असल्याबाबत

**(१४) * १७२१८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पायधुनी व मस्जिद बंदर परिसरात वैधता संपलेल्या सौंदर्यप्रसाधनांचा साठा करून त्यावरील तारीख थिनरच्या सहाय्याने खोडली जात असून त्यावर नव्या तारखेचा स्टॅम्प मारून पुन्हा विक्री करीत असलेल्या तिघा जणांना मुंबई गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने दिनांक ३ जानेवारी, २०२३ च्या दरम्यान छापा टाकून अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरात व राज्यात अशा प्रकारचे रॅकेट चालविणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई यांच्या पथकाने प्राप्त माहितीच्या आधारे दिनांक ०३/०१/२०२३ रोजी छापा टाकून सदर प्रकरणी गु.र.क्र. ०२/२०२३ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह औषधी व सौदर्य प्रसाधने कायदा कलम ९(सी) व ई-सिगारेट प्रतिबंधक कायदा २०१९ कलम ७ व ८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. वैधता संपलेला जप्त माल आरोपींनी कोठून प्राप्त केला, याबाबत तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाथरी (जि.परभणी) येथे वरिष्ठ स्तर न्यायालय व अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करणेबाबत

**(१५) * १७१७८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनपेठ, मानवत, सेलू व पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील जनतेकरीता भौगोलिकदृष्टया सोयीस्कर असलेल्या पाथरी येथे वरिष्ठ स्तर न्यायालय व अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०२१ च्या दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे ई-मेल/लेखी निवेदनाव्दारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदन महाप्रबंधक मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना दिनांक २२ जून, २०२१ रोजी सादर करण्यात आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने न्यायालय, न्यायिक अधिकारी व इतर बाबींसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी परभणी यांच्या स्तरावरून करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची थोडक्यात सविस्तर माहिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. हे खरे आहे.

दिनांक २५/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मा.श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, विधानपरीषद सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री यांना पाथरी जिल्हा परभणी येथे दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर व जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्याची विनंती केली आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) राज्यात कोठे न्यायालय स्थापन करावयाचे याबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून शासनास शिफारस करण्यात येते व तदनंतर त्याबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्यात येतो. पाथरी, जिल्हा परभणी येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव न्यायिक अधिकारी यांचेसाठी शासकीय निवासस्थान आणि न्यायालयासाठी जागेची अनुपलब्धता या कारणास्तव नाकारण्यात आला आहे आणि दिवाणी न्यायाधिशवरिष्ठ स्तर स्थापन करण्याचा प्रस्ताव पुरेशी प्रलंबित प्रकरणांची संख्या आणि न्यायिक अधिकारी यांचेसाठी शासकीय निवासस्थान आणि न्यायालयासाठी जागा या कारणास्तव नाकारण्यात आला आहे असे प्रबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी कळविले आहे. तसेच पाथरी (जि.परभणी) येथे वरिष्ठ स्तर न्यायालय व अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करणेसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाकडून मागणी करण्यात आली नसल्याचे आणि याबाबत काहीही पत्रव्यवहार कार्यालयास प्राप्त नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१६) * १७२५५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १६०८१ ला दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलिसांकडे नोव्हेंबर, २०२२ अखेरपर्यंत सायबर फसवणूकीच्या ४ हजार २८६ गुन्ह्यांची नोंद झाली असून गेल्यावर्षीच्या तुलनेत या गुन्ह्यात ४९ टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिसांनी मोठ्या प्रमाणात क्रेडिट कार्ड आणि ऑनलाईन फसवणूक केल्याच्या १ हजार २२३ गुन्ह्यांची तर खरेदी, गिफ्ट, नोकरी, विमा, शैक्षणिक प्रवेश, गुंतवणूक, क्रिप्टो करन्सी, कर्ज आणि अन्य फसवणुकींच्या १ हजार ९६१ गुन्ह्यांच्या नोंदी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोव्हेंबर, २०२२ अखेरपर्यंत फसवणुकीच्या ४ हजार २८६ गुन्ह्यांपैकी पोलिसांना फक्त २७९ गुन्ह्यांची उकल करण्यात यश आल्याचे समोर आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईकरांची सायबर चोरांपासून मुक्तता करण्यासाठी तसेच वाढत असलेल्या सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्यासाठी मा.गृह मंत्र्यांकडे इकॉनोमिक ऑफन्सेस विंग च्या धर्तीवर स्मॉल फ्रॉड विंगची निर्मिती करण्याबाबत केलेल्या विनंतीवर शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत सायबर फसवणुकीच्या दाखल गुन्हयांची संख्या ४,२८६ इतकी असून माहे नोव्हेंबर, २०२१ च्या तुलनेत ७० % वाढ झाली आहे.
(२) मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत क्रेडिट कार्ड आणि ऑनलाईन फसवणूक केल्याचे एकूण १२९४ गुन्हे दाखल असून त्यापैकी ३७ गुन्हे उघड झाले आहेत. तर खरेदी, गिफ्ट, नोकरी, विमा, शैक्षणिक प्रवेश, गुंतवणूक, क्रिप्टो करन्सी, कर्ज आणि अन्य फसवणूकींचे एकूण २२१६ गुन्हे नोंद झाले असून त्यापैकी १३२ गुन्हे उघड झाले आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) वाढत्या सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्यासाठी मुंबई पोलीस आयुक्तालयात प्रादेशिक स्तरावर ५ सायबर पोलीस ठाणे उभारण्यात आली आहेत. सायबर गुन्ह्यांचा तपास जलद गतीने होण्यासाठी सायबर लॅब व पोलीस ठाण्यांना अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्यात आली असून तूर्त स्मॉल फ्रॉड विंग किंवा तत्सम कक्ष निर्मिती प्रस्तावित नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी क्षेत्रातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा पुरविणेबाबत

**(१७)** * **१७३५६ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी क्षेत्रात खाजगी व्यवस्थापनाच्या शाळा असून या शाळेत बहुसंख्य आदिवासी विद्यार्थी आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शासकीय आदिवासी शाळेतील मुलांप्रमाणे सेवा सुविधा दिल्या जात नाहीत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आदिवासी क्षेत्रातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शासकीय आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे सोयी-सुविधा देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) आदिवासी विकास विभाग शासन पत्र क्र. अआशा-२०१७/प्र.क्र.१२७/का.११, दिनांक ०६/०७/२०१९ अन्वये शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे खाजगी व्यवस्थापनेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना आश्रमशाळा संहितेमध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व निश्चित केल्यानुसार अन्न घटकांच्या प्रमाणानुसार आहार दिला जातो.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. बीसीएच-२०१८/प्र.क्र.७९/शिक्षण-२, दिनांक ०३ मार्च, २०१९ नुसार विद्यार्थ्यांचे परिपोषण अनुदान दरमहा दरडोई रुपये १५००/- याप्रमाणे अदा करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेळगाव (जि.जळगाव) बॅरेज प्रकल्प निधी उपलब्ध असूनही अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१८) * १७६४० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेळगाव (जि.जळगाव) बॅरेज प्रकल्पासाठी निधी उपलब्ध असूनही सदर प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकल्प आजपर्यंत अपूर्णावस्थेत असल्याची कारणे काय आहेत, तसेच प्रकल्पासाठी निधी उपलब्ध असूनही प्रकल्प अपूर्ण ठेवणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्प सन २०२३ मध्ये पूर्णत्वास येण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे, शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे बांधकाम पूर्ण झाले आहे व प्रकल्पात सद्य:स्थितीत ६.०१८ द.ल.घ.मी. पाणीसाठा करण्यात आलेला आहे. प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रातील तीन पूलांपैकी दोन पूलांचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित एका पूलाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच धरण सरेखेच्या खालील बाजुस असणाऱ्या पूलाचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे बांधकाम भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले आहे. बुडीत क्षेत्रातील प्रगतीपथावरील पुल जून, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रकल्पाचे काम जून, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाच्या अद्यावत किमतीस व उर्वरित कामांसाठी सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जमातीच्या संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती लागू करण्याबाबत

**(१९) * १७२१६ श्री.कपिल पाटील, श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १६२०१ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीच्या पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधनाकरीता राज्य शासनाच्या अंतर्गत असणाऱ्या आदिवासी विभागामार्फत कोणत्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य व संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यार्थ्यांना बार्टी, सारथी आणि महाज्योती प्रमाणे संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे अंतर्गत संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती सुरु करण्याची मागणी आदिवासी संशोधक विद्यार्थी कृती समिती यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संशोधन अधिछात्रवृत्तीमध्ये अन्य विद्याशाखांचा समावेश करून योजनेचा लक्षांक वाढविणे व अधिछात्रवृत्तीच्या रकमेत सुधारणा करणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वित्त विभागास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत अनुसूचित जमातीच्या सर्व (पीएच.डी) संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती लागु करण्याबाबत व त्यासाठी संस्थेस लागणाऱ्या निधीची तरतुद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकरीता संशोधन अधिछात्रवृत्ती ही योजना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत राबविण्यात येत होती.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात येणारी संशोधन अधिछात्रवृत्ती ही योजना सुरवातीला केवळ २ उमेदवारांकरीता आदिवासी क्षेत्रामधील सामाजिक व आर्थिक बदलांच्या प्रक्रियेचा व आदिवासी जमातीचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने राबविण्यात येत होती. त्यामध्ये अन्य विद्याशाखांचा समावेश नव्हता. त्यामुळे सदर संशोधन अधिछात्रवृत्तीमध्ये अन्य विद्याशाखांचा समावेश करुन योजनेचा लक्षांक वाढविणे व अधिछात्रवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याबाबत प्रस्ताव वित्त विभागाचे मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला होता.सदर प्रस्तावास वित्त विभागाने मान्यता दिलेली असून महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या १०० उमेदवारांना दरवर्षी भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठ/ महाविद्यालय/ संस्था यामध्ये कोणत्याही विषयात पूर्णवेळ व नियमितरित्या पीएच.डी. करण्यासाठी अधिकतम पाच वर्षासाठी अधिछात्रवृत्ती देणे या योजनेस शासन निर्णय दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आखाडा बाळापूर (जि.हिगोंली) येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) * १७७४८ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आखाडा बाळापूर (जि.हिगोंली) येथील पोलीस स्थानकामध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची दुरवस्था झाली असल्यामुळे पोलीस कर्मचारी इतरत्र भाडे तत्वावर राहत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोलीस स्थानकाची इमारत व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या बांधकामाचे प्रस्ताव अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने येथील पोलीस कर्मचाऱ्यांची निवासस्थानाअभावी होत असलेली गैरसोय लक्षात घेता या प्रस्तावाला मंजूरी व निधी उपलब्ध करुन नवीन पोलीस स्थानक व पोलीस निवासस्थान उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) येथील पोलीस स्थानक परिसरामध्ये जुने असलेले पुर्वीपासून एकूण १५ निवासस्थाने असून राहण्यास योग्य नाही. सदर निवासस्थाने मोडकळीस आलेली, पडझड झालेली असल्याने त्या ठिकाणी एकही अधिकारी/कर्मचारी निवासस्थानात राहत नाहीत. तसेच ठाणे प्रभारी अधिकारी यांचे निवासस्थानाची पडझड झालेली असून, दुरूस्ती, डागडूजी करून राहत आहेत.

(२) व (३) आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) येथील पोलीस स्थानक इमारत बांधकामाबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे दिनांक १८/०२/२०१४ पत्रान्वये पोलीस महासंचालक कार्यालयास प्राप्त झालेला असून पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे.

राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरवून दिनांक ०७/०२/२०२३ पत्रान्वये सदर प्राधान्यक्रम यादीस मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये आखाडा बाळापूर पोलीस स्थानकामध्ये असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचे ५४ निवासस्थान बांधकामाचा समावेश आहे.

त्यानुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या, यांचेकडून सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत तांत्रिक व सिंचन व्यवस्थापन शाखेतील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

**(२१) * १६९१८ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत तांत्रिक व सिंचन व्यवस्थापन शाखेतील मंजूर व रिक्त पदांबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला असून तो अद्यापही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांत्रिक व सिंचन व्यवस्थापन शाखेतील एकूण ४४६१ महत्वाची पदे रिक्त असल्याने संबंधित विभागाला आवश्यक कार्यालयीन तथा प्रशासकीय कामे करण्यांस अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तांत्रिक व सिंचन व्यवस्थापन शाखेतील ४४६१ पदे मंजूर व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

प्राप्त प्रस्तावाचे अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत तांत्रिक व सिंचन व्यवस्थापन शाखेतील ४०७३ पदे रिक्त आहे. सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून कामकाज करुन घेण्यात येत आहे. आवश्यकतेनुरुप बदलीने व पदोन्नतीने पदे भरण्यात येत आहेत.

(३) राज्य शासनाने वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ३१/१०/२०२२ अन्वये पदभरती वरील निर्बंध शिथिल करुन सरळसेवेची रिक्त पदे भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार जलसंपदा विभागातील सरळसेवेची गट-अ व गट-ब ची रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. तसेच, गट-क संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी जलसंपदा विभाग, शासन निर्णय, दिनांक १७/११/२०२२ अन्वये समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून प्रादेशिक स्तरावरील निवड समिती गठीत करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक २७/०१/२०२३ अन्वये जलसंपदा विभागातील गट-क संवर्गाची नामनिर्देशनाची पदे भरण्यासाठी राज्यस्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यात लव जिहाद धर्मांतर्गत होणाऱ्या विवाहाच्या घटना रोखणेबाबत

**(२२)** * **१७८३४ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात लव जिहाद धर्मांतर विवाहाच्या विविध घटनांतर्गत पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल झाल्याची बाब जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकार रोखण्याबाबत कोणत्या प्रकारच्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, सन २०२२ मध्ये अमरावती जिल्ह्यात खालीलप्रमाणे घटना घडलेल्या आहेत :-

पो.स्टे. बडनेरा व पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर याठिकाणी मिसिंग मुलींचे प्रकरण लव्ह जिहाद आहे असा आरोप करण्यात आला होता.परंतु सदरहू मिसिंग मुली मिळून आल्यानंतर त्यांनी त्या स्वत:च्या मर्जीने घर सोडून गेल्या असून त्यांच्यावर इतर धार्मिक व्यक्ती किंवा समुदाय यांच्याकडून कोणताही दबाव नसल्याचे जबाबात नमूद केले आहे. तसेच, विवाह लावून देण्याचा अधिकार नसताना विवाह प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी चंद्रविला धर्मदाय ट्रस्ट विजय कॉलनी, अमरावती या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४६८, ४१७, ३४ अन्वये पो.स्टे. फ्रेजरपुरा येथे गु.र.क्र. ५९०/२०२२ दाखल करण्यात आला आहे. यामध्ये कोणताही धार्मिक दबाव असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

पो.स्टे. धारणी येथे मुस्लिम धर्मीय पती व इतरांनी छळ केल्याप्रकरणी हिंदू धर्मीय महिलेने दिलेल्या तक्रारीवरुन भारतीय दंड संहिता कलम ४९८ (अ), २९५ (अ), ५०६, ३४ अन्वये गु.र.क्र. ४५७/२०२२ दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान फिर्यादीने सदरची तक्रार रागाच्या भरात केली असून पुढील कोणतीही कारवाई करावयाची नसल्याचा जबाब दिला आहे. त्यामुळे सदर गुन्हा "ब फायनल" तयार करुन मंजूरी करीता पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथील तहसिलदार व त्यांचे सहकारी यांना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना पकडल्याबाबत

**(२३) * १७१४९ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग, जि.रायगड येथील तहसिलदार व त्यांचे सहकारी यांना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रोख २ लाख रुपयांची लाच घेतांना पकडले असल्याचे दिनांक १३/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिनल दळवी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या निवासस्थानी, ऑफीस इत्यादिची झडती घेतली असता लाखो रुपये रोकड, दागिने,जागेची कागदपत्रे इत्यादि बेनामी संपत्ती आढळून आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्यांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) I. आलोसे संबंधित तहसिलदार, अलिबाग, जि.रायगड (वर्ग-१) यांचे अलिबाग, जि.रायगड येथील घराच्या घरझडतीमध्ये (१) रुपये ३,२२,९६५/- किंमतीच्या चिजवस्तू, (२) रोख रक्कम रुपये ५८,८९०/- व

(३) ५९९.७० ग्रॅम सोन्याचे दागिने अशी मालमत्ता आढळून आली आहे.
II. तसेच आलोसे संबंधित तहसिलदार यांच्या विक्रोळी (पूर्व), मुंबई येथील घरझडतीमध्ये एकूण (१) रोख रक्कम रुपये १,०१,९९,५००/-, (२) रुपये १,१४,२००/- किंमतीच्या चिजवस्तू व (३) सन २०१९ मध्ये खरेदी केलेली रुपये ७,५०,०००/- किंमतीची एक हुंडाई आय-२० कार अशी मालमत्ता आढळून आली आहे. त्याचप्रमाणे आरोपी लोकसेविका व त्यांचे पती यांचे संयुक्तिक नावे हरियाली, एलबीएस मार्ग, कांजुरमार्ग, मुंबई याठिकाणी ऑफीस व आलोसे यांच्या नावे म्हाडा न्यू पीएमजीपी सीएचएल लि. नवघर, मुलुंड येथे सदनिका असल्याचे कागदपत्रात आढळून आले आहे.
(३) व (४) i. आरोपी लोकसेविका तहसिलदार, अलिबाग यांच्याविरूध्द दाखल गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सुरू आहे.

ii. आरोपी लोकसेविका संबंधित तहसिलदार, अलिबाग यांना महसूल विभागामार्फत दिनांक ०७/१२/२०२२ च्या आदेशान्वये अटक केल्याच्या दिनांकापासून म्हणजे दिनांक १२/११/२०२२ रोजी पासून निलंबित करण्यात आले आहे. तसेच, संबंधित आलोसे तहसिलदार, अलिबाग यांची महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ खाली सविस्तर विभागीय चौकशी करण्याची कार्यवाही महसूल विभागाकडून सुरु आहे

iii. आरोपी लोकसेविका यांच्या मालमत्तेची उघड चौकशीची कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वालीव (ता.वसई, जि.पालघर) येथे पोलिसांनी रक्तचंदनाची अनधिकृत वाहतूक करणारा कंटेनर पकडल्याबाबत

**(२४) * १७४१२ श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) येथे वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कामण चौकी येथे रक्तचंदनाची अनधिकृत वाहतूक करणारा कंटेनर दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पकडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशीत रुपये सहा कोटींचे रक्त चंदन सापडले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), व (३) होय.

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत वालीव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१३६६/२०२२ भादंविस कलम ३७९, ४१३, ३४ सह भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४१, ४२ प्रमाणे दिनांक २६/१२/२०२२ रोजी गुन्हा दाखल केला असून एकूण रुपये ९,३०,००,०००/- किंमतीचे १५.५५० टन वजन असलेले रक्तचंदन जप्त करण्यात आले आहे.

सदर गुन्हयात एकूण ०९ आरोपीत निष्पन्न करण्यात आले असून, त्यापैकी ०५ आरोपीत यांना अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा नियोजन समित्यांचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२५) * १७८८६ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्य नियोजनासाठी सर्वांगिण विकास करण्यासाठी राज्यातील नियोजन समित्यांना जिल्हानिहाय सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी रुपये १४०४२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, तसेच जिल्हा नियोजन समितीचा जिल्हा विकास निधीपैकी जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत नागपूर जिल्ह्यात फक्त १४.४७ टक्के इतकाच खर्च झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी आतापर्यंत केवळ रुपये १८७३ कोटी म्हणजे केवळ सरासरी १७ टक्केच निधी विकास कामावर खर्च झाला असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, तसेच नागपूर जिल्ह्यात दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत जिल्हा विकास निधी एकूण किती टक्के खर्च अपेक्षित आहे व इतक्या कमी प्रमाणात जिल्हा विकास निधी खर्च करण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा निधी आर्थिक वर्षात खर्च होण्यास शिल्लक राहिलेला कालावधी लक्षात घेता, अनावश्यक कामावर निधी खर्च न करता हा निधी उपेक्षित घटकावर खर्च करण्यात यावा अशी मागणी जनतेकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधी उर्वरित काळात खर्च होण्यासाठी शासनाने कोणते नियोजन केले आहे व नियोजनाचे सूत्र निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सर्व जिल्ह्यांना रुपये १३,३४० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत वितरित केलेल्या निधीपैकी दिनांक ०७/०२/२०२३ अखेरपर्यंत २५ टक्के निधी खर्च झालेला आहे.

तसेच मार्च, २०२३ अखेरपर्यंत सर्व निधी खर्च करण्याबाबत नियोजन करण्याचे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक ०७/०२/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले असून जिल्हाधिकारी स्तरावर त्याप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या निविदेबाबत

**(२६) * १८१३८ ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १५२५५ ला दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे काम अदानी रिॲल्टी या कंपनीला देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, प्राप्त झालेल्या पात्र विकासकांच्या आर्थिक निविदा (तांत्रिक मूल्यांकनानंतर) उघडून सचिव समिती स्तरावर विचारार्थ ठेवण्यात आल्या असून त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी पुनर्विकास प्रकल्पाची निविदा रद्द करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्पात अतिरिक्त सवलती देऊन पुन्हा नव्याने सुधारित जागतिक निविदा प्रक्रियेची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवण्यात आली.

निविदा धारकामधुन उच्चतम निविदाधारकांस धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मुख्य भागीदार (Lead Partner) म्हणून निवड करण्यासाठी दिनांक १५/१२/२०२२ रोजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सचिव समितीच्या बैठकीत मे. अदानी प्रॉपर्टीज प्रा. लि. हे उच्चतम निविदाकार ठरले आहेत.

-----------------

## मिरजगांव, (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील सिना परिसर नागरी सह. पतसंस्था, मर्या. संस्थेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२७) * १८१४९ प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मिरजगांव (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील सिना परिसर नागरी सह. पतसंस्था, मर्यादित दिनांक १३/०८/२०२१ रोजी रुपये ९ कोटींचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा लेखापरिक्षण अहवाल सादर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २८/०१/२०२२ च्या लेखापरिक्षण अहवालानुसार आर्थिक गुन्हे शाखेकडे त्याबाबत तपास सुरू असतानाही संचालक मंडळातील सदस्यांचे व्यवसाय सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २८/०१/२०२२ च्या लेखापरिक्षण अहवालानुसार आर्थिक गुन्हे शाखेकडे त्याबाबत तपास सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषी संचालक मंडळावर अद्यापही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त संचालक मंडळावर गुन्हे दाखल करून कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सिना परिसर नागरी सह. पतसंस्था, मर्यादित मिरजगावचे दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३१/०३/२०२१ या कालावधीचे करण्यात आलेल्या लेखापरीक्षण अहवालामध्ये एकूण रुपये ३.९३ कोटी इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये दिनांक २७/१०/२०२१ रोजीच्या आदेशानुसार प्राधिकृत चौकशी अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेल्या चौकशीत सदरचा अपहार रुपये ८.८१ कोटी इतका असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) सद्य:स्थितीत सदर पतसंस्थेत गैरव्यवहार झाल्याचे उघड झाल्यापासून सदरची पतसंस्था बंद आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द कर्जत पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे दिनांक ०५/०८/२०२१ रोजी गु.र.नं. ५०५/२०२१ अंतर्गत भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४०६, ४०८, ४०९, ४६७, ४६८, ४७१, २०१, ३४ व एम.पी.आय.डी. १९९९ कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याची व्याप्ती मोठी असल्याने दिनांक १९/०८/२०२१ रोजी सदरचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे देण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणातील १४ आरोपींपैकी १० आरोपींविरुध्द मा.न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरु आहे.

-----------------

## राज्यातील होमगार्ड यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(२८) * १६९३८ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील होमगार्ड यांना ६५ दिवस नियमित रोजगार द्यावा, होमगार्डना शासकीय सेवेत रुजू करून त्यांना मानधन सुरु करण्यात यावे, दर तीन वर्षांनी पोलीस विभागातील भरती प्रक्रियेत ५० टक्के आरक्षण देण्यात यावे अथवा इतर राज्याप्रमाणे होमगार्ड जवानांना त्याच तीन वर्षाचा सेवेनंतर राज्य पोलीस विभागात सरळ नियुक्ती देण्यात यावी यासारख्या अनेक मागण्यांसाठी अनेक लोकप्रतिनिधींनी यांनी शासनाकडे वारंवार मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार मागणी करूनही होमगार्ड यांच्या समस्या अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने होमगार्ड यांना ६५ दिवस नियमित रोजगार द्यावा, होमगार्डना शासकीय सेवेत रुजू करून त्यांना मानधन सुरु करण्यात यावे, दर तीन वर्षांनी पोलीस विभागातील भरती प्रक्रियेत ५० टक्के आरक्षण देण्यात यावे अथवा इतर राज्याप्रमाणे होमगार्ड जवानांना त्याच तीन वर्षाचा सेवेनंतर राज्य पोलीस विभागात सरळ नियुक्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/०१/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील होमगार्डना वर्षातून १८० दिवस काम देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून या अनुषंगाने पोलीस महासंचालक यांचे मागणीनुसार कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व वाहतूक नियमन कर्तव्यासाठी होमगार्ड जास्तीत जास्त प्रमाणात पुरविण्यात येतात.

होमगार्डना पोलीस भरतीत दयावयाच्या आरक्षणाबाबत दिनांक ०१/०३/२०१९ रोजी मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत महाराष्ट्र होमगार्डना सद्य:स्थितीत पोलीस भरतीमध्ये असलेले ५ टक्के आरक्षण योग्य असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोथी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीनीने आत्महत्या केल्याबाबत

**(२९)** * **१७४५१ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोथी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) शासकीय आदिवासी आश्रमशाळा येथील एका आदिवासी विद्यार्थीनीने दिनांक १५ जुलै, २०२२ रोजी राहत्या खोलीत आत्महत्या केल्याची घटना घडलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २६/०७/२०२२ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, आदिवासी विभाग, मंत्रालय यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी अद्यापही चौकशी पूर्ण झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणाची सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थितीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) शासकीय आश्रमशाळा बोथी येथील इयत्ता १० वी मध्ये शिकत असलेल्या कु. शिवानी सदाशिव वावधने या विद्यार्थीनीने दिनांक २१ जुलै, २०२२ रोजी वसतिगृहातील राहत्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केलेली आहे.

(२) होय.

(३) व (४) प्रस्तूत प्रकरणी प्रकल्प अधिकारी, कळमनुरी यांच्या अध्यक्षतेखाली आपतकालीन आढावा समितीने घटनास्थळी भेट देऊन प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला आहे. याप्रकरणी मृत विद्यार्थीनीच्या पालकांच्या तक्रारीवरुन या आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व स्त्री अधिक्षिका यांचेविरुध्द पोलीस ठाणे, बाळापूर येथे गु.रं.नं. २८४/२०२२ भा.द.वि. कलम ३०६, ३४ सहकलम ३(२)(५) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा सुधारित कायदा १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी श्री.के.आय. खांडरे माध्यमिक मुख्याध्यापक व श्रीमती एस.एम. विणकरे, स्त्री अधिक्षिका यांना दिनांक २४/०८/२०२२ च्या आदेशान्वये निलंबित केले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

सदर मृत विद्यार्थीनीच्या पालकांना रुपये २.०० लक्ष इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महावितरणने प्रस्तावित केलेली वीज दरवाढ रोखण्याबाबत

**(३०) * १८२४४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण या राज्य शासनाच्या कंपनीने महाराष्ट्र राज्य वीज नियामक मंडळाकडे आगामी दोन वर्षांमध्ये रुपये ६७ हजार कोटीचा तोटा भरून काढण्यासाठी ३७ टक्के वीज दरवाढीचा प्रस्ताव मांडला असल्याने छोटे उद्योग आणि मध्यमवर्गीय घरगुती ग्राहकांची आर्थिक परिस्थिती बिकट होणार असल्याची बाब दिनांक २८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने पुन्हा पुढच्या वर्षी आणखी १५ टक्के वीज दरवाढ करण्याचे सुचविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने त्यात काय आढळून आले आहे आणि सर्वसामान्य वीज ग्राहकाला दिलासा देण्यासाठी महावितरणने प्रस्तावित केलेली अवाजवी वीज दरवाढ रोखण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. वार्षिक महसूलाची गरज व अपेक्षित महसूल हयामधील तफावत भरुन काढण्यासाठी विविध वर्गवारीचे वीजदर मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगातर्फे ठरविले जातात. सदर तफावतीला महसूली तुट असे संबोधले जाते. परंतु सदर महसूली तुट म्हणजे महावितरण कंपनीचा तोटा नाही. महावितरण कंपनीतर्फे सादर केलेल्या मध्यावधी आढावा याचिकेत एकूण महसूलातील तुट रुपये ६७,६४४ कोटी इतकी प्रस्तावित करण्यात आली आहे. ही तुट ६ वर्षांपोटी आलेली आहे.

प्रस्तावित केलेली महसूली तूट ही मुख्यत्वे वीज खरेदी खर्चातील वाढ जी प्रामुख्याने कायदा बदलामुळे (Change in Law) देय असलेली रक्कम, महानिर्मिती व पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन इंडिया लि. यांच्या खर्चातील वाढ, नॅशनल पॉवर कॉर्पोरेशन इंडिया लि. यांच्या दरातील वाढ, घरगुती कोळशाच्या टंचाई अभावी (Coal blending मुळे) वीजखरेदी खर्चात झालेल्या वाढीमुळे आहे. सदर तफावत ही महावितरणच्या नियंत्रणाबाहेरील घटकांमुळे आहे.

सन २०२०-२१ व सन २०२१-२२ मधील कोविड-१९ च्या महामारीमुळे सबसिडायझिंग वर्गवारी जसे की, औद्योगिक, वाणिज्यिक इत्यादी वर्गवारीच्या वीज वापरामध्ये घट होऊन सबसिडायीइड वर्गवारीतील वीज वापरामध्ये वाढ झाली. परिणाम स्वरुप महावितरणची महसूली तूट अधिक वाढली. ह्या सर्व घटकांमुळे होत असलेली खर्चातील वाढ अपरीहार्य आहे. सदर दरवाढ ही आर्थिक दायित्व पूर्ण करण्यासाठी आणि महावितरणची आर्थिक व्यवहार्यता टिकवून ठेवण्यासाठी गरजेची आहे.

(२) हे खरे नाही.

उपरोक्त महसूली तूट भरुन काढण्यासाठी सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षात सरासरी दरवाढ वर्षनिहाय अनुक्रमे केवळ १४% व ११% प्रस्तावित केलेली आहे. तथापि, सदर याचिका मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विचाराधीन असून सदर याचिकेकर येणाऱ्या मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसारच वीजदर आकारणी महावितरण कंपनीला लागू होते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना खारभूमी योजनेतंर्गत नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(३१)** * **१६९८४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील खारमाचेला, खारचीरब घाट, खारढोंबी, खारमसबाड, खारपाले, खार जांभेला, जुई अब्बास खारभूमी योजनेतील पाच गावांच्या लाभक्षेत्रातील शेती सुपीक राहण्यासाठी आवश्यक समुद्र संरक्षक बंधाऱ्यांची निगा व दुरूस्ती खारलँड विभागाकडून गेल्या ३ वर्षापासून करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समुद्र संरक्षक बंधारे नादुरूस्त असल्यामुळे समुद्राचे पाणी शेतात येवून सुमारे २००० एकर शेतजमीन नापीक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संरक्षक बंधारे व उघाडीची दुरूस्ती तातडीने करावी व बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी पाच गावातील सुमारे २१० शेतकऱ्यांनी आपले व्यक्तिगत मागणी अर्ज पेण येथील खारभूमी विकास विभागाचे सहाय्यक कार्यकारी अभियंता यांच्याकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी तसेच बंधारे व उघाडी याची दुरूस्ती करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

खारमाचेला, खारचीरब घाट, खार जांभेला ही गावे माचेला चीर्बी योजनेच्या प्रापण क्षेत्रात येतात. खारढोंबी, खारमसबाड, खारपाले, ही गावे जूई हब्बास योजनेच्या प्रापण क्षेत्रात येतात. माचेला चीर्बी व जूई हब्बास योजनेच्या नुतनीकरणाचे काम J.S.W. कंपनीमार्फत CSR फंडातून अनुक्रमे मे-२०२० व मार्च-२०२१ रोजी सुरु करण्यात आले. सद्य:स्थितीत माचेला चीर्बी योजनेचे ७०% काम पूर्ण झालेले असून जूई हब्बास योजनेचे ९०% काम पूर्ण झालेले आहे. दोन्ही योजनांचे उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. ही कामे मे,२०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर योजनेच्या नुतनीकरणाचे काम हाती घेण्यापूर्वी सन २०१८-१९ व २०१९-२० या काळात रायगड जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी व मोठी उधाने यामुळे जुई हब्बास व माचेला चिर्बी या योजनेस खांडी जाऊन शेतीत काही प्रमाणात पाणी घुसले होते.

(३) हे खरे आहे.

पुन:प्रापित क्षेत्रातील शेतकऱ्यांनी योजनेच्या नादुरुस्त झालेला भाग तातडीने दुरुस्त करण्याबाबत मागणी केली आहे.

(४) खारभूमी अधिनियम, १९७९ मध्ये नुकसान भरपाई देण्याबाबत कोणत्याही तरतूदीचे प्रावधान नाही.

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार माचेला चीर्बी व जूई हब्बास योजनांच्या नुतनीकरणाचे काम J.S.W. कंपनीमार्फत CSR फंडातून मे, २०२० व मार्च, २०२१ रोजी सुरु करण्यात आले आहे व सद्य:स्थितीत माचेला चीर्बी योजनेचे ७०% काम पूर्ण झालेले असून जूई हब्बास योजनेचे ९०% काम पूर्ण झालेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वीज वितरणाच्या खासगीकरणास विरोध करण्याकरीता वीज कामगार, अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्याबाबत

**(३२) * १७२२३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तळोजा औद्योगिक वसाहत क्षेत्र प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसर, संपूर्ण नवी मुंबई, ठाणे शहर, मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र, यामध्ये समांतर वीज वितरणासाठी परवाना मिळावा यासाठी अदानी इलेक्ट्रिसिटीने महाराष्ट्र वीज नियमक आयोगाकडे अर्ज केल्याने तळोजा औद्योगिक वसाहत क्षेत्र प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसर, बेलापूर, पनवेल व उरण यासह संपूर्ण नवी मुंबई ठाणे शहर मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुलुंड व भांडूप मध्ये वीज कामगार संघटनांनी खाजगीकरण करण्यास विरोध म्हणून सुमारे ७६ हजार वीज कर्मचारी, अभियंते, अधिकारी, तसेच ४२ हजार कंत्राटी कामगार सुरक्षा रक्षकांनी दिनांक ४ जानेवारी २०२३ पासून तीन दिवसाचा संप पुकारला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय वीज कायद्यानुसार महावितरण बरोबर या क्षेत्रातील खाजगी कंपन्यांनाही वीज वितरणाचा परवाना मिळू शकत असल्याने पुणे, पिंपरी चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीण मधील काही भागात वीज वितरणासाठी अहमदाबाद, गुजरात येथील टोरंटो पॉवर लिमिटेड या कंपनीने वीज नियामक आयोगाकडे अर्ज दाखल केले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगीकरण विरोधात तीन दिवसीय संपाबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी अभियंते,अधिकारी संघर्ष समिती यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०२३ रोजी महावितरण महानिर्मिती व महापारेषण या तिन्ही कंपन्यांना संपाची नोटीस बजावली होती, परंतु त्यावर कोणताही तोडगा निघाला नव्हता, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, अदानी समुहाला समांतर वीज वितरणाची परवानगी देण्याबाबत तसेच सदर टोरंटो कंपनीच्या अर्जावर वीज नियामक आयोग अथवा शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, टोरंटो पॉवर लिमिटेडने पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे जिल्ह्याच्या अन्य क्षेत्रांमध्ये समांतर विजेचे वितरण करण्यासाठी परवान्याच्या मागणीसाठी दिनांक ८ डिसेंबर, २०२२ रोजी वीज नियामक आयोगाकडे याचिका दाखल केली आहे.

(३) महावितरण कंपनीच्या भांडूप परिमंडळातील कार्यक्षेत्रामध्ये अदानी इलेक्ट्रिकल कंपनीने वितरणाचा विद्युत नियामक आयोगाकडे मागितलेल्या परवान्यास महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अधिकारी, अभियंता संघर्ष समिती (२९ संघटना) व महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन या सर्व सघटनांचा तीव्र विरोध असल्यामुळे दिनांक ०४/०१/२०२३ रोजी ७२ तासांच्या संपाची नोटीस प्रशासनास दिलेली होती. त्यानुसार दिनांक ०४/०१/२०२३ रोजी संप करण्यात आला होता. सदर संपाच्या नोटीसीच्या अनुषंगाने, दिनांक ०४/०१/२०२३ रोजी मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथी गृह, मलबार हिल येथे सर्व संघटनांची बैठक संपन्न झाली होती. सदर बैठकीत संघटनेच्या मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाल्यामुळे दिनांक ०४/०१/२०२३ रोजी दुपार नंतर संप मागे घेण्यात आला होता.

(४) विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ मध्ये आयोगाकडे प्राप्त झालेल्या परवाना अर्जावर कार्यवाही करण्यासाठीची कार्यपध्दती निर्धारित करण्यात आली आहे. अधिनियमांच्या वरील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेंच प्रकल्पातील लोहघोगरी तोतलाडोह बोगदा योजनेला निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(३३) * १६९१९ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच प्रकल्पातील पाण्याची तुट भरून काढण्यासाठी लोहघोगरी तोतलाडोह बोगदा (टनल) योजनेला आवश्यक निधी उपलब्ध करून देणेबाबतच्या प्रस्तावाला जलसंपदा विभागास दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ ला शासन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संदर्भीय आदेशानुसार लोहघोगरी गावाजवळ कन्हान नदीमधून ६२ कि.मी. लांबीच्या बोगदयाद्वारे १० अब्ज घनफुट पाणी तोतलाडोह धरणात वळविण्याच्या एकूण प्रकल्पात ३६१२ कोटी रूपये किंमतीस दोन टप्प्यात मान्यता प्रदान करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही प्रशासकीय मान्यता प्राप्त असूनही आवश्यक निधीची मंजुरी न मिळाल्याने या महत्वपूर्ण वळण योजनेचे काम सुरू करण्यात आलेले नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकल्पाकरीता प्रस्तावित आवश्यक निधी उपलब्ध करून टनेल योजनेचे काम सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्र.प्रशामा-२०१९/प्र.क्र.३५७/मोप्र-२/दिनांक १८/०९/२०१९ अन्वये लोहघोगरी बोगदा प्रकल्पास रुपये ३६१२.०० कोटी किंमतीस पुढीलप्रमाणे दोन टप्प्यात प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार या योजनेस प्रथम टप्प्यात रुपये १७.५५ कोटी करीता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून यात प्रकल्पास आवश्यक असलेली मध्यप्रदेश शासनाची संमती प्राप्त करुन पर्यावरण मान्यता, वन जमीनीचे प्रस्तावास मान्यता, केंद्रीय जल आयोगाची मान्यता, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण ई.वैधानिक मान्यता प्राप्त करणे अभिप्रेत आहे. उपरोक्त सर्व मान्यता प्राप्त करुन घेण्याच्या अटीच्या अधीन राहून या प्रकलपाच्या कामाकरीता रुपये ३६१२/- कोटी इतक्या किंमतीस द्वितीय टप्प्यात तत्वत: प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

योजनेचे काम अद्याप सुरू करण्यात आले नाही.

प्रकल्पाचे स्थळ व टनलची पूर्ण लांबी मध्यप्रदेश क्षेत्रात येते त्यामुळे प्रकल्प हाती घेण्यास मध्यप्रदेश शासनाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे व ती मिळविण्याकरीता आंतरराज्यीय बोर्डाची बैठक होणे आवश्यक आहे. तथापि, ही बैठक अद्याप झाली नाही. प्रमुख अभियंता, मध्यप्रदेश व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, शिवणी, मध्यप्रदेश यांना मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, नागपूर कार्यालयाचे पत्र क्र. ११४८ दिनांक १२/०५/२०२० अन्वये लोहघोगरी टनेल योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करून त्यास मान्यता कळविण्याची विनंती केली आहे. प्रमुख अभियंता, जलसंधारण विभाग भोपाल (मध्यप्रदेश) यांनी त्यांचे प्रत्र दिनांक ०८/०६/२०२० अन्वये विविध आंतरराज्यीय बाबीवर चर्चा करण्याकरीता घेण्यात येणाऱ्या मुख्य सचिव स्तरावरील बैठकीच्या विषय सुचीमध्ये उपरोक्त प्रस्तावाचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजना (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) येथील सौर ऊर्जा प्रकल्पामुळे पांदण रस्ता अडविला गेल्याबाबत

**(३४) * १७८३९ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजना (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) येथील सौर ऊर्जा प्रकल्पामुळे पांदण रस्ता अडविला गेल्याची बाब माहे जानेवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्याबाबत ग्रामवासियांनी तहसिलदारकडे रीतसर तक्रार करूनही अद्याप कुठलीच कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर खाजगी सौर ऊर्जा प्रकल्पधारकावर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. राजना ग्रामवासियांकडून दिनांक ०५/०१/२०२३ रोजी रस्ता अडवल्याबाबत महसूल विभागाकडे तक्रार प्राप्त झाली असता राजना (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) येथील मेसर्स अवाडा एम.एच.सस्टेनेबल प्रा.लि. या कंपनीच्या १५० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पामधून गावनकाशानुसार शिवरस्ते व पांदण रस्ते गेलेले असल्याचे दिनांक ०६/०१/२०२३ रोजी महसूल यंत्रणा, ग्रामस्थ राजना व कंपनीचे प्रतिनिधी यांचेसमवेत केलेल्या मोका पाहणीवेळी आढळून आले.

(२) मेसर्स अवाडा एम.एच.सस्टेनेबल प्रा.लि. या कंपनीच्या सौर ऊर्जा प्रकल्पामधून गेलेल्या तुळजापूर ते राजना शिवपांदण रस्त्यावरील शेतीच्या वहिवाटीकरीता असलेल्या रस्त्यावर कंपनीकडून अतिक्रमण केले होते. अतिक्रमीत रस्ता मोकळा करुन देण्यासंदर्भात महसूल यंत्रणा, सरपंच, ग्रामपंचायत, पोलीस पाटील व ग्रामस्थ, मौजे राजना आणि कंपनीचे प्रतिनिधी यांच्या समवेत दिनांक १३/०१/२०२३ रोजी बैठक घेऊन सदरचा रस्ता मोकळा करुन देण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार कंपनीने तुळजापूर-राजना शिव पांदण रस्ता मोकळा केलेला आहे.

संबंधित शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले असल्याचे दिसून आले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेठ (जि.नाशिक) येथील एकलव्य निवासी शाळेच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन दिले जात असल्याबाबत

**(३५) * १७१६३ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ (नाशिक) रोडवरील आदिवासी विकास विभागाच्या एकलव्य रेसिडेन्शिअल मॉडेल निवासी शाळा वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करणाऱ्या सेंट्रल किचन संस्थेकडून निकृष्ट दर्जाचे भोजन दिले जात असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी भोजनात अळया सापडल्याचा आरोप करत शेकडो विद्यार्थ्यांनी अन्नत्याग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांनी जोपर्यंत जेवणाचा दर्जा सुधारत नाही तोपर्यंत जेवण न घेण्याची भूमिका घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

शासकीय आश्रमशाळा मुंढेगाव, ता.इगतपूरी, जि.नाशिक येथील मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून नाशिक, राजूर व जव्हार या प्रकल्पातील ३७ शासकीय आश्रमशाळा व ५ एकलव्य निवासी शाळांतील विद्यार्थ्यांना भोजन व अल्पोपहार पुरविण्यात येतो.

एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल पेठरोड, ता.जि.नाशिक या शाळेतदेखील उक्त प्रमाणे पुरवठा करण्यात आलेल्या मुगडाळीच्या वरणामध्ये दिनांक ०६ जानेवारी, २०२३ रोजी १ विद्यार्थ्यास अळी दिसल्याचे त्याने प्राचार्यांच्या निदर्शनास आणले व त्यानंतर विद्यार्थ्यांनी जेवणावर बहिष्कार घातला.

(४) सदर घटनेची माहिती मिळाल्याबरोबर तातडीने अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांनी नाशिक प्रकल्प कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), तसेच मध्यवर्ती स्वयंपाकगृहाचे प्लांट मॅनेजर यांच्यासह दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट दिली. अपर आयुक्त यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या भोजनात तात्काळ सुधारणा करण्याबाबत संबंधित यंत्रणा व संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी यांना समज दिली. तसेच घटनेची सविस्तर चौकशी करण्याबाबत प्रकल्प अधिकारी, नाशिक यांना निर्देश दिले. त्यानुसार प्रकल्प कार्यालय, नाशिक यांचे स्तरावरुन सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे.

प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावरुन चौकशी समितीने प्रत्यक्ष मध्यवर्ती स्वयंपाकगृह मुंढेगाव येथे घटनास्थळी,भेट देऊन चौकशी केली. चौकशीनुसार मध्यवर्ती स्वयंपाकगृहातील अन्नधान्यात अळया आढळुन आल्या नाहीत. सदर घटनेच्या दिवशी इतर ४१ शाळांनाही भोजनाचा पुरवठा झालेला होता, सदरील शाळांकडून जेवणात अळी निघाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. मध्यवर्ती स्वंयपाकगृहास पुरवठा केले जाणारे धान्य एफ.एस.एस.आय प्रमाणीत होते. चपाती थंड न करता गरम असतानाच भरत असल्या कारणाने वाफेमुळे त्या चिपकत असल्याचे लक्षात आल्याने त्या आता थंड करुन भरण्यात येत आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत जेवणाबाबत विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर येथील महावितरण विभागातील कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना पकडल्याबाबत

**(३६) * १७४१३ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर येथील महावितरण विभागातील कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांना लाच घेताना दिनांक २६ डिसेंबर,२०२२ रोजीच्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने अटक केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे कॅम्प, पालघर यांनी केलेल्या सापळा कारवाईमध्ये दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी आलोसे कार्यकारी अभियंता, संचालन व सुव्यवस्था विभाग म.रा.वि.वि.कं. पालघर कार्यालय (वर्ग-१) यांना आलोसे अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. पालघर मंडळ कार्यालय (वर्ग-१) यांचेकरीता रुपये १,००,०००/-इतकी लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. संबंधित आरोपी लोकसेवकाविरुध्द दिनांक २६/१२/२०२२ रोजी पालघर पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार

प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. दाखल केलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने, आलोसे संबंधित कार्यकारी अभियंता व आरोपी लोकसेविका अधीक्षक अभियंता यांना दिनांक २७/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आलेली असून सदर गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांच्यामार्फत सुरू आहे.
(२) I. सदर प्रकरणी आलोसे संबंधित कार्यकारी अभियंता, संचालन व सुव्यवस्था विभाग म.रा.वि.वि.कं. पालघर कार्यालय (वर्ग-१) व आरोपी लोकसेविका अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. पालघर मंडळ कार्यालय (वर्ग-१) यांच्याविरुध्द मालमत्तेच्या उघड चौकशीची कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.
II. सह व्यवस्थापकीय संचालक, कोकण प्रादेशिक विभाग, ठाणे यांच्या कार्यालयाच्या दिनांक २८/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधित आलोसे कार्यकारी अभियंता, संचालन व सुव्यवस्था विभाग, म.रा.वि.वि.कं. पालघर कार्यालय (वर्ग-१) व आरोपी लोकसेविका अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. पालघर मंडळ कार्यालय (वर्ग-१) यांना गुन्हा दाखल झालेल्या तारखेपासून पुर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक २६/१२/२०२२ पासून शिस्तभंग कारवाई पूर्ण करुन पुढील अंतिम आदेशापर्यंत कंपनीच्या सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घुसखोरी रोखण्याबाबत

**(३७) * १८१६३ अॅड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विक्रोळी, प्रतिक्षानगर, मुलुंड येथील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाश्यांना स्थलांतरीत करण्यासाठी मुंबईत विविध ठिकाणी असलेल्या म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घुसखोरी रोखण्याबाबत निश्चित धोरण ठरविण्यासाठी शासनाने निवृत्त सनदी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास त्रिसदस्यीय समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समितीच्या कामाची कार्यकक्षा काय आहे व समितीचे अन्य सदस्य कोणकोण आहेत तसेच सदरहू समितीचा अहवालासाठी शासनाने किती दिवसांची कालमर्यादा आखून दिली आहे,
(३) असल्यास, समितीने आजपर्यंत केलेल्या कामाचा अहवाल सादर केला आहे काय, केलेल्या शिफारशींची व त्यावर शासनाच्या अभिप्रायांचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत संक्रमण शिबिराच्या तसेच बृहतसुचीमार्फत होणाऱ्या गाळयांचे वाटप करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याकरीता दिनांक १७/०१/२०२३ च्या शासन निर्णयान्वये श्री.सुरेश कुमार, सेवानिवृत्त भा.प्र.से. यांच्या अध्यक्षेतखाली समिती गठित करण्यात आली आहे.

सदर समितीने बृहतसुचीमधील गाळयांचे वितरण पध्दती पारदर्शक, सर्वसामान्यास वापरण्यास सोपी करण्याबाबतच्या शिफारशींचा अहवाल सादर करण्यास १ महिन्याची मुदत देण्यात आली आहे. समितीने त्यांचा अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली असून याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी शासकीय अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या मृत्यूंच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(३८) * १७९२६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.राजहंस सिंह, श्री.अंबादास दानवे, श्री.सचिन अहिर, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.महादेव जानकर, श्री.जयंत पाटील, श्री. सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी शासकीय आश्रमशाळेत फेब्रुवारी,२०१७ ते जून, २०२२ या कालावधीमध्ये ६८० तर शासकीय अनुदानित आश्रमशाळांमध्ये ४६४ आदिवासी विद्यार्थ्यांच्या मृत्यूची चौकशी करुन विद्यार्थ्यांना आश्रमशाळेत देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा व त्यांच्या आरोग्याबाबत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती शासनास उपलब्ध करुन देण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याची मागणी मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी २८२ मुलांच्या मृत्यूची २२ वेगवेगळी कारणे नोंदवली असून त्यात सर्वाधिक मृत्यू हे आजारपणामुळे झाले असल्याने या मुलांच्या आरोग्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये श्वसनाचा आजार, ॲनेमिया, सिकलसेल, मोठ्या आतड्यांचा आजार यांसारख्या आजाराने २०६ विद्यार्थ्यांचा तसेच आश्रमशाळांमध्ये गळफास घेवून २६, अपघातात-४४, पाण्यात बुडुन-३१, सर्पदंश होवून-२९, विजेच्या धक्याने-०८, अन्नातून विषबाधा होवून-०२, भाजून-०३, विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे, नाशिक व नागपूर व अमरावती विभागांतर्गत आश्रमशाळांमधून झालेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूंपैकी सर्वाधिक मृत्यू हे नाशिकमधील आश्रमशाळांमध्ये झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात अनुदानित आदिवासी आश्रमशाळांची संख्या ५४० असून आश्रमशाळातील विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधा व शिक्षण, आरोग्यासाठी सन २०१७ पासून ते डिसेंबर, २०२२ पर्यंत किती निधीची तरतुद करण्यात आली, किती निधी वितरीत करण्यात आला, तसेच शासनाकडून देण्यात येणाऱ्या निधीचा आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी खर्च करण्यात येतो किंवा नाही याबाबत माहिती घेण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली जाते, करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा थोडक्यात तपशील काय आहे,

(६) असल्यास, शासनाने आदिवासी आश्रमशाळांमध्ये होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन राज्याच्या शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये व अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या, राहण्यासाठी योग्य सोयी-सुविधा मिळण्याबाबत तसेच त्यांची वैद्यकीय तपासणी करुन त्यांना योग्य उपचार मिळण्याबाबत तसेच भविष्यातील बालमृत्यू रोखण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) निवेदन प्राप्त झाले, हे खरे आहे.
(२) सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या ५ वर्षामध्ये शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळेच्या ताब्यात असताना आजारपणामुळे उपचारादरम्यान अनुक्रमे ३० व ३५ असे एकूण ६५ विद्यार्थी मृत्यू पावलेले आहेत. उर्वरीत विद्यार्थ्यांचा मृत्यू पालकांच्या ताब्यात असताना झालेले आहेत.
(३) सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या ५ वर्षामध्ये अनुदानित आश्रमशाळेच्या ताब्यात असताना, सर्पदंशामुळे ५, विजेचा शॉक-२, आजारपण-३५, अपघात-४ व आत्महत्या-७ असे एकूण ५३ विद्यार्थी मृत्यू पावलेले आहेत. उर्वरीत विद्यार्थ्यांचा मृत्यू पालकांच्या ताब्यात असताना झालेले आहेत.
(४) हे खरे आहे.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक अंतर्गत एकूण २१४ शासकीय आश्रमशाळा तसेच २११ अनुदानित आश्रमशाळा आहेत. त्यामुळे नाशिक विभागात विद्यार्थी मृत्यू संख्या जास्त आहे.
(५) अनुदानित आश्रमशाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अल्पोपहार व भोजन, शालेय पाठयपुस्तक, लेखन साहित्य, ग्रंथालय, वैद्यकीय उपचार खर्च, शैक्षणिक साहित्य, गणवेश, अंथरुण, पांघरुण, भांडी साहित्य, नाईट ड्रेस, गादी, विदयुत देयक, सॅनेटरी नॅपकीन, फर्निचर, विज्ञान साहित्य, तेल, दंतमंजन इत्यादींकरीता लागणारा अनुषंगिक खर्च म्हणून संबंधित अनुदानित आश्रमशाळेच्या स्वयंसेवी संस्थेला परिरक्षण अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

उक्त खर्च भागविण्याच्या अनुषंगाने सन २०१७-१८ ते ३१ डिसेंबर, २०२२ या ६ वर्षाकरीता स्वयंसेवी संस्थेला लेखाशिर्ष २२२५-F-१२९ अंतर्गत रुपये १९९६,४०,४८,००० इतकी तरतूद अर्थसंकल्पीत केलेली असून त्यापैकी १२१६,३७,७१,३०० इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे, सदर वितरित निधीपैकी रुपये १००९,२९,९९,९०० (रुपये एक हजार नऊ कोटी, एकोणतीस लक्ष नव्याण्णव हजार नऊशे मात्र) इतका खर्च करण्यात आलेला आहे.
(६) शासकीय/ अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यूकारणांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ. सुभाष साळुंके, सेवा निवृत्त महासंचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिलेल्या अहवालानुसार यापुढे होणाऱ्या प्रत्येक मृत्यू प्रकरणाची त्वरीत दखल घेऊन प्राथमिक चौकशी करणे, विद्यार्थी मृत्यूचे वैद्यकीय सामाजिक दृष्टीने विश्लेषण करणे, प्रत्येक प्रशासकीय स्तरावर त्वरीत कार्यवाही होते किंवा कसे याबाबत त्रैमासिक आढावा घेण्याच्या अनुषंगाने दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्प स्तरावर आपत्कालीन आढावा गट, वैद्यकीय सामाजिक आढावा समिती तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती अशा विविध समित्यांची स्थापना करण्यात आलेल्या असून त्याद्वारे कार्यवाही सुरू आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरुड (जि.रायगड) येथील आंबोली धरणावरील उजव्या व डाव्या तीर कालव्याचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(३९) * १६९८६ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२१९७ ला दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरुडसह (जि.रायगड) बारा गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी आंबोली धरण २००९ साली बांधण्यात आले असून यासाठी सुमारे ३० कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंबोली धरणावर अवलंबून असलेल्या उजव्या व डाव्या तीर कालव्याचे काम तब्बल सात वर्षांपासून बंद पडल्याने हजारो शेतकऱ्यांना कालव्याचे पाणी मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आंबोली धरणाच्या उजव्या तीर कालव्याचे काम दहा किलोमीटर प्रस्तावित असून सद्य:स्थितीत ६.१ किलोमीटर काम अपूर्ण आहे तर डाव्या तीर कालव्याचे २.६४ किमी प्रस्तावित असून १.६४ किमी काम सात वर्षांपासून रखडले असून तब्बल ६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता असतानाही शेतकऱ्यांना कालव्याचे काम रखडल्यामुळे दुबार पीक घेण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आंबोली कालव्याच्या कामाच्या प्रकल्प १२३ कोटींचा असून भूसंपादनाचे शंभर कोटीहून अधिक रकमेचे वाटप झालेले असूनही अद्यापही सदर प्रकल्प अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कालव्याचे काम पूर्ण झाल्यास बागायती, दुग्ध व्यवसाय व कृषी पर्यटनाला चालना मिळून, शेतकऱ्यांना पूरक व्यवसायाची संधी मिळणार असल्याने सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.
अंबोली धरणावरील उजव्या व डाव्या तीर कालव्यांपासून एकूण ४४ हे. इतकी सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.
(३) हे अंशतः खरे आहे.
अंबोली धरणाच्या उजव्या तीर कालवा लांबी ७.१० कि.मी. प्रस्तावित असून त्यापैकी कि.मी. १.० मधील कामे पूर्ण झाली असून कि.मी. २ मधील सा.क्र. २ मधील १/६०० मी. पर्यंत कालवा खोदाई झाली आहे. डाव्या तीर कालवा लांबी २.६४ कि.मी. पैकी १.० कि.मी. मधील कामे पूर्ण झाली असून उर्वरित लांबीतील कामे प्रथम मंजूर सुप्रमामध्ये कालवा वितरण प्रणाली प्रस्तावित होती परंतु आता पारंपारिक उघड्या कालव्यांऐवजी बंदिस्त नलिका वितरण प्रणाली (PDN) मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे. नलिका वितरण प्रणालीचे संकल्पनाचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) हे अंशतः खरे आहे.
प्रकल्पासाठी आवश्यक ९८.२८ हे. क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण झालेले असून जाहीर अंतिम निवाड्यानुसार शेतकऱ्यांना रक्कम रुपये ४.६८ कोटी अदा करण्यात आलेली आहे आणि सदर खातेदारांनी कलम - १८ खाली दिवाणी न्यायालयात केलेल्या दाव्यांनुसार वाढीव नुकसान भरपाईकरीता रक्कम रुपये ६३.४८ कोटी मा.न्यायालयात जमा करण्यात आलेली आहे.

(५) अंबोली प्रकल्पास जसंवि शा.नि.क्र. लपायो-२०१९/(प्र.क्र.२०८)/ खारभुमी, दिनांक १३/१२/२०२२ नुसार द्वितीय सुप्रमा मंजुरी प्राप्त झाली आहे. प्रकल्पाची व कालव्यांची उर्वरीत कामे निधी उपलब्धतेनुसार पुढील दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा धरणाचा कालवा फुटला असल्याबाबत

**(४०) * १७२२४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मुंबईकरीता पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा धरणाचा उजवा कालवा आवारे गावानजिक फुटल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात लाखो लिटर पाण्याची नासाडी झाली असून कालवा परिसरातील सदरचे पाणी शेतात घुसल्याने १०० एकर भातशेतीसह व भाजीपाल्यासह शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सदर ५४ किलोमीटर लांबीच्या कालव्याच्या देखभालीसाठी शासनाने केवळ एकच कर्मचारी तैनात केला असून त्याच्याकडून भातशेतीची पाणीपट्टी वसुली व अन्य तदनुषंगिक कामे करण्यात येत असल्याचेही त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर कालव्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांच्या पीकांच्या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच कालव्याच्या देखभालीसाठी कर्मचारी संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे,

भातसा उजवा कालवा लगत असलेल्या आवरे गावात कृषी, जलसंपदा व महसूल विभागाच्या प्रतिनिधींनी केलेल्या संयुक्त पंचनाम्यानुसार एकूण ११.६७ हेक्टर शेतीचे नुकसान व संबंधित क्षेत्रातील शेतीचे बांध काही प्रमाणात वाहून गेल्याचे आढळते.

भातसा उजवा तीर कालव्याद्वारे कोंकण हंगाम २०२२-२३ च्या सिंचन आवर्तनाकरीता कालव्यामध्ये सुमारे २५० क्युसेक्स विसर्ग सुरु असताना दिनांक ०४/०१/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजता कि.मी. १५ मधील सा. क्र. १४/५७० मी. मध्ये भराव खचल्याचे निदर्शनास आले.

भातसा उजवा तीर कालव्यावर सिंचन व्यवस्थापनाकरीता शाखानिहाय तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणुक करण्यात आली आहे. तांत्रिक कर्मचाऱ्यांची अंतर्गत उपविभागाच्या आस्थापनेवर असलेले २ मजुर व दरवर्षी प्रापणसुची अंतर्गत मंजूर बाह्य अभिकरणाद्वारे पुरवण्यात येणाऱ्या मनुष्यबळाचा वापर करुन पाणीपट्टी वसुली व अनुषंगिक कामे केली जातात.

(३) भातसा उजवा तीर कालवा दिनांक ०४/०१/२०२३ रोजी क्षतिग्रस्त झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर तात्काळ सिंचन आवर्तनाकरीता सोडलेले पाणी पूर्णपणे बंद करण्यात आले होते व यांत्रिकी विभागामार्फ़त आपत्कालीन दुरुस्ती करून दिनांक ०९/०१/२०२३ रोजी सिंचन आर्वतनाकरीता कालव्याव्दारे करण्यात येणारा पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला होता.दरम्यानच्या कालावधीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे महसूल, कृषी व जलसंपदा विभागामार्फत पंचनामे करण्यात आलेले आहेत. कृषी विभागामार्फत नुकसानीचा अहवाल प्राप्त झाला असून नुकसान भरपाईची रक्कम रुपये १.६७ लक्ष अदायगीची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिचोली, हिंगणा (जि.नागपूर) तसेच काठीखमारी (जि.भंडारा) उपसा सिंचन प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(४१) * १६९२० श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिचोली, हिंगणा (जि.नागपूर) तथा काठीखमारी (जि.भंडारा) बीडचिचघाट, सिहोरा, माथनी, बाबदेव उपसा सिंचन योजनेला आवश्यक निधीची तरतुद करणेबाबत दिनांक ४ नोव्हेंबर २०२२ रोजी कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी प्रस्ताव विभागाला सादर केलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व उपसासिंचन योजनेला आवश्यक निधीची तरतुद करणेबाबत प्रशासकीय मान्यता प्राप्त असून दुष्काळ उपाययोजनेकरीता महसूल व वनविभागामार्फत नविन लेखाशीर्ष क्रमांक ४२५० ए ०४३ उघडण्यात आले असून निधीची तरतूद अद्यापही अप्राप्त असल्याने सिंचनाची कामे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने उपसा सिंचन योजनेकरीता प्रस्तावित आवश्यक निधी उपलब्ध करून योजनेचे काम सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

चिचोली, हिंगणा (जि.नागपूर), काठीखमारी (जि.भंडारा), बीडचिचघाट, सिहोरा, माथनी, बाबदेव या ७ उपसा सिंचन योजनांच्या आवश्यक निधी तरतुदीबाबत दिनांक ४ नोव्हेंबर, २०२२ रोजी महामंडळाद्वारे प्रस्ताव सादर झालेला नाही. तथापि, या ७ उपसा सिंचन योजनांपैकी प्रशासकीय मान्यता प्राप्त असलेल्या बीडचिचघाट, सिहोरा, माथनी, बाबदेव या ४ उपसा सिंचन योजनेकरीता वार्षिक योजना सन २०२३-२४ च्या आखणीनुसार निधी मागणी महामंडळाचे पत्र क्र.८५७६/दिनांक ०८/१२/२०२२ अन्वये शासनास प्राप्त असून सदर निधी मागणी महसूल व वन विभागास सादर करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

उपरोक्त ७ योजनांपैकी ४ उपसा सिंचन योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. तथापि, सर्व ७ उपसा सिंचन योजनांकरीता महसूल व वन विभागामार्फत नविन लेखाशीर्ष क्र.४२५०A०४३ उघडण्यात आले असून सद्य:स्थितीत प्रशासकीय मान्यता प्राप्त ४ उपसा सिंचन योजनेकरीता निधी अप्राप्त आहे.

तथापि, सिहोरा उपसा सिंचन योजनेंतर्गत रबर डॅम एअर इन्फ्लेटेड पध्दतीने (४th Generation) कार्यान्वित करणे प्रस्तावित असून यामध्ये नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजित असल्यामुळे महसूल व वन विभागाकडून निधी प्राप्त होईपर्यंत महामंडळाच्या स्वनिधीतून खर्च करण्याकरीता नियामक मंडळाच्या ८० व्या बैठकीत मंजुरी प्रदान करण्यात आली असून त्यानुसार कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) उपरोक्त ७ योजनांपैकी प्रशासकीय मान्यता प्राप्त असलेल्या बीडचिचघाट, सिहोरा, माथनी, बाबदेव या ४ उपसा सिंचन योजनांकरीता वार्षिक योजना सन २०२३-२४ ची आखणीनुसार निधीची मागणी महसूल व वन विभागाकडे करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबेगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा सुरू करण्याबाबत

**(४२) * १८०८४ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील शेतकऱ्यांना रात्री शेतीला पाणी देण्यासाठी जावे लागते, तथापि रात्रीच्या वेळी पाळीव प्राणी आणि माणसांवर बिबट्यांचे प्राणघातक हल्ले होत असल्याने दिवसा वीज मिळावी याकरीता तेथील शेतकऱ्यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजीच्या सुमारास वीज मंडळावर मोर्चा काढून आपले निवेदन संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणकडून शेती पंपासाठी वीज दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत, तसेच शासनाने शेतकऱ्यांच्या शेती पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

शेतकऱ्यांना शेती पंपासाठी दिवसा १२ तास वीज पुरवठा मिळण्याबाबतचे दिनांक १३/१२/२०२२ रोजीचे निवेदन महावितरण कंपनीस दिनांक २८/१२/२०२२ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत वीज भार व्यवस्थापन करण्यासाठी तसेच कृषी पंपासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार आंबेगाव, ता.जुन्नर, जि.पुणे सहीत संपूर्ण राज्यातील कृषीवाहिन्यांवरील ग्राहकांना रात्रीच्या काळात ८ तास किंवा दिवसा ८ तास थ्री फेज विजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.

(३) शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज पुरवठा देणे हे मुख्य उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून "अटल सौर कृषी पंप योजना" व "मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना" अंतर्गत १,१२,६६२ पंप आस्थापित करण्यात आले असून "मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना" अंतर्गत महावितरण कंपनीने १५०९ मे.वॅटचे वीज खरेदी करार

केलेले आहेत आणि त्यापैकी ५४८ मे.वॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झालेले असून त्यामधून राज्यात एकूण २१७ कृषी वाहिन्यांवरील ९०,७२५ कृषी ग्राहकांना लाभ मिळत आहे.

तसेच दिनांक ०२/११/२०२२ च्या शासन निर्णयानुसार सन २०२५ पर्यंत कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यातील ३०% कृषी वाहिन्या ह्या सौर ऊर्जेवर आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या व्यतिरिक्त केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान ऊर्जा एवंम उत्थान अभियान योजनेतील घटक-अ मध्ये सन २०२०-२१ साठी प्राप्त ५०० मे.वॅ. क्षमतेचे विकेंद्रित ग्रीड सलंग्नित सौर प्रकल्पांसाठी परवानगीनुसार महावितरणने २०१.५ मे.वॅ. क्षमतेचे कार्यादेश देण्यात आले असून, त्यापैकी ३१ मे.वॅ. क्षमतेचे वीज खरेदी करार करण्यात आले आहेत. तसेच घटक-ब अंतर्गत महाऊर्जामार्फत पारेषण विरहीत सौर कृषीपंप आस्थापित करण्यात येत असून, ४५००० सौरपंप जाने-२०२३ अखेर कार्यान्वित करण्यात आले आहेत व घटक-क मध्ये सन २०२०-२१ साठी २,५०,००० ग्रीड संलग्नित सौर पंपासाठी मंजुरी प्रदान केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महारेरा नोंदणीकृत प्रकल्पाची माहिती अद्ययावत करणेबाबत

**(४३) * १८१७१ ॲड.अनिल परब, श्री.प्रसाद लाड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महारेरा गृहनिर्माण प्रकल्पाची नोंदणीनंतर रेरा कायद्याच्या कलम ११ मधील तरतूदीप्रमाणे प्रकल्पाच्या प्रवर्तकाने नोंदणीच्या वेळी पुरविलेली माहिती दर तीन महिन्यांनी महारेराच्या वेबसाईटवर नियमित स्वरूपात अद्ययावत करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, घर खरेदीदारांची फसवणूक टाळण्यासाठी महारेराने कठोर नियम केले असून त्याचाच एक भाग म्हणून महारेराच्या संनियंत्रण यंत्रणा अधिक भक्कम करण्यासाठी सन २०१७ पासून महारेराकडे नोंदणी झालेल्या प्रकल्पांचा आढावा घेणे सुरू केल्यानंतर १८ हजारांहून अधिक प्रवर्तकांनी याकडे दुर्लक्ष केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी महारेराने अशा १८ हजार विकासकांपैकी २ हजार विकासकांवर दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजीच्या सुमारास नोटीसा बजावण्यात आल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महारेराच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या विकांसकाविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच गृहनिर्माण प्रकल्पाची माहिती अदयावत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे नोंदणी असलेल्या ज्या विकासकांनी माहिती अद्ययावत केली नाही, अशा १९५३९ विकासकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

(४) नोटीस दिल्यानंतर ३१४ विकासकांनी महारेराच्या संकेतस्थाळावर माहिती अद्यावत केली आहेत.

जे विकासक महाराष्ट्र स्थावर सपंदा नियामक प्राधिकरणाद्वारे दिलेल्या नोटीशीच्या अनुषंगाने माहिती अद्यावत करणार नाहीत, अशा विकासकांवर स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम ६० व कलम ६१ अन्वये कारवाई करण्यात येईल, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.